# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 405 नाग/2010

श्री मुजाहिदुल हक अन्सारी
इस्माईलपूरा, कामठी,
ता. कामठी जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एच. आय. शिंदे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशिक्षण)
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे
ता. जि. पुणे 30
2) श्री बी. डी. फडतरे
जन माहिती अधिकारी तथा संचालक (प्रशिक्षण)
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे
ता. जि. पुणे 30 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 1.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दि. 27.9.2010 रोजी आयोगाकडे तक्रार दाखल करुन असे नमुद केले की अपील क्र. 1159/2010 मधील दि. 1.9.2010 रोजीच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे सी.डी.च्या स्वरुपात माहिती उपलब्ध झाली. मात्र सी.डी. मध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे नमुद केलेले आहे. आजच्या सुनावणीत तक्रारदार यांनी असे नमुद केले की त्यांना प्रामुख्याने उर्दू माध्यमाच्या प्रवेशाची माहिती पाहिजे होती तसेच माजी सैनिक संवर्गातून ज्या कॉलेजला विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे त्याचीही माहिती पाहिजे होती. परंतू सदरची माहिती सी. डी.त त्यांना उपलब्ध झालेली दिसून येत नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रभारी उपसंचालक (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशिक्षण) हे देखील हजर होते. त्यांनी

सुनावणीत असे नमुद केले की मा. आयोगाकडील अपील क. 1159/2010 मधील दि. 1.9.2010 रोजीच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना उर्दू माध्यमाच्या प्रवेशाची माहिती सी.डी.च्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांना डी.टी.एड. प्रवेश प्रक्रिया बाबत माहिती मागितलेली होती. प्रवेश प्रक्रियेचे काम संगणका मार्फत करण्यात येत असल्याने व सन 2009–10 साठी डी.टी.एड. प्रवेश प्रक्रियेचे काम पूर्ण झाल्याने तक्रारदारास सी. डी.च्या स्वरुपात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपूर यांचे दि. 7.9.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची सी.डी. व माहिती तक्रारदारास मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्या सी.डी.तील उर्दू माध्यमाच्या प्रवेशाची माहिती नेमकी कोणती आहे तसेच माजी सैनिक संवर्गातून ज्या कॉलेजला विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे त्यांची नावे, गुण इत्यादींची माहिती तक्रारदार यांना पाहिजे आहे. सदरची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात सी.डी. मध्ये जी दिलेली आहे ती संपूर्ण माहिती तक्रारदारास आयोगा समोर समजावून सांगितली. त्याबद्यल तक्रारदार यांचे माहिती बाबत समाधान झाले म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1216-1217

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 407 नाग/2010**

श्री नरेंद्र मधुकर साखरकर
रा. सुमठाण पो. कोसरसार
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी
(मुख्यालय व नियोजन)
दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर
2) श्री एस. डी. गीरी
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 1.1.2011 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 20.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. 20.9.2010 च्या तक्रार अर्जाने अशी तक्रार केली आहे की राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. 793/2010 मधील दि. 29.6.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे 10 दिवसात त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही तसेच शासन निर्णय स्पर्धा परीक्षेचा नसतांना प्रकल्पग्रस्तांच्या जागा खुल्या स्पर्धा परीक्षेने व प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला आहे असे त्यांना सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्र. 793/2010 मधील दि. 29.6.2010 चा निर्णय प्रथम त्यांचे कार्यालयाकडे न येता चंद्रपूर कार्यालयाकडे प्राप्त झाला. मात्र जन माहिती अधिकारी यांचे ऑफीस गडचिरोली येथे दि. 7.5.2010 रोजी नव्याने कार्यरत झाले म्हणून चंद्रपूर कार्यालयाने गडचिरोली कार्यालयाकडे आयोगाचा आदेश दि. 13.9.2010 रोजी पाठविला. मा. आयोगाचे आदेशात

असे नमुद केलेले होते की अपीलकर्ता यांना 10 दिवसाच्या आंत प्रकल्पग्रस्तांच्या स्पर्धा परीक्षा सन 2008 पूर्वी कशा पध्दतीने घेण्यात येत होत्या त्याबद्यलची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश होते. मा. आयोगाच्या या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. 19.9.2010 रोजी प्रकल्पग्रस्तांच्या स्पर्धा परीक्षा सन 2008 पूर्वी ज्या पध्दतीने घेण्यात येत होत्या त्याबाबतचे दि. 18.7.2008 चा शासन निर्णय तसेच दि. 27.10.2008 चा शासन निर्णय व दि. 27.8.2008 चा शासन निर्णय या तीन शासन निर्णयाच्या प्रती अपीलकर्त्यास पाठविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या निर्णयाच्या प्रती तक्रारदार यांना मिळाल्याबाबत त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की 27 आक्टोबर 2009 ला स्पर्धा परीक्षा अंतर्गत भरती करण्यात आली त्यात ते यशस्वीरीत्या पात्र ठरले परंतू त्याची निवड केली नाही. तथापी तक्रारदार यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून तक्रारदार यांनी त्यांच्या निवडी बाबत त्यांचेकडे प्राप्त झालेल्या माहितीच्या अधिकारा खाली योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1219-1220

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 193 नाग/2010

श्री भरत प्रभाकरभाई राजगुरु
इंदिरा गांधी वार्ड, रेलटोली,
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री के. बी. मिश्रा
जन माहिती अधिकारी (नझुल विभाग)
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 1.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 30.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार हे गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी गोंदिया हे उपस्थित आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुन घेता आले नाही. तथापी तक्रारदार यांनी आयोगाकडे दि. 30.6.2010 रोजी तक्रार केलेली असून त्या तक्रारीत असे नमुद केले आहे की त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे गोंदिया नझुल शीट क्र. 1 ते 32 जिन भुखंड पट्टाधारकोसे अनर्जीत रक्कम वसुली की गयी है उनकी चालान की प्रतिलिपी अथवा यादी उपलब्ध करण्याबाबत माहितीच्या अधिकारा खाली माहिती मागितलेली होती. तथापी त्यांचा माहिती मागण्याचा अर्ज एका अधिका–याकडून दुस–या अधिका–याकडे व दुस–या अधिका–याकडून तीस–या अधिका–याकडे हस्तांतर करण्यात आला आणि त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केली असे त्यांनी तक्रार अर्जात नमुद केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री के. बी. मिश्रा (नझुल विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की तक्रारदार यांचा दि. 27.4.2010 चा माहितीच्या अधिकारा खालील अर्ज प्रथम जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे प्राप्त झाला. मात्र सदरची माहिती उपविभागीय अधिकारी तथा नझूल अधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांनी दि. 28.4.2010 रोजी सदरचा अर्ज उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे पाठवून त्याची प्रत तक्रारदारास दिली. आणि तक्रारदारास उपविभागीय अधिकारी तथा नझूल अधिकारी गोंदिया यांचेशी संपर्क साधण्याबाबत विनंती केली.

4. त्यानंतर तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांनी दि. 28.12.2010 च्या पत्राने तक्रारदारास गोंदिया येथील शीट क्र. 1 ते 32 मध्ये भुखंड पट्टाधारकाकडून अनर्जीत रक्कम वसुल करण्यात आलेली आहे त्या भुखंड पट्टाधारकाची यादी तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. आणि सदरची माहिती तक्रारदार यांनी दिनांक 30.12.2010 रोजी प्राप्त केल्याचे दिसून येते.

5. प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तक्रारदार यांचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 27.4.2010 रोजीचा होता. त्यांना नियमाप्रमाणे 30 दिवसाचे मुदतीत म्हणजे दि. 27.5.2010पर्यंत माहीती उपलब्ध

करुन देणे अपेक्षित होते. मात्र जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांनी तक्रारदारास दि. 28.12.2010 च्या पत्राने माहीती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून तक्रारदारास माहीती उपलब्ध करुन देण्यास सुमारे पाच महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांच्याकडून का विलंब झालेला आहे याचा कोणताही खुलासा त्यांनी सादर केला नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत करणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात असून जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांनी तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास वर नमुद केल्या प्रमाणे सुमारे पाच महिन्याचा विलंब झालेला दिसून येतो म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत त्यांच्या वरीष्ठां मार्फत सादर करावा. सदर मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने खुलाशासाठी पाठविण्यात यावा.

3) प्रत **उपविभागीय अधिकारी गोंदिया** यांचेकडे माहिती करीता व कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावा.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1220-1221

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1420 नाग/2010

श्री प्रकाश मुकुंदराव पंत
कुकडेवाडा प्लॉट नं 852, श्री धन्वंतरी हॉस्पीटल समोर,
खरेटाऊन धरमपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. आर. भोंडवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य महाव्यवस्थापक
व्यवस्थापकीय संचालक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई
प्रकाशगड, वांद्रे(पूर्व) मुंबई 400 051
2) श्री धिनमिने
जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
व्यवस्थापकीय संचालक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई
प्रकाशगड, वांद्रे(पूर्व) मुंबई 400 051 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.8.2007 रोजी मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना यापूर्वी राज्य माहिती आयोग मुंबई यांचेकडून तीन वेळा सुनावणी झाल्याचे दिसून येते. मात्र त्यानंतर दि. 13.8.2010 च्या सुनावणीत प्रस्तूत अपील राज्य माहिती आयोग नागपूर यांचेकडे सुनावणी घेवून निर्णय देण्यासाठी हस्तांतर करण्यात आले आहे. त्याला अनुसरुन राज्य माहिती आयोग नागपूर या कार्यालयाकडून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना 29 ऑक्टोबर 2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी. सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र दि. 23.11.2010 च्या सुनावणीस महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. मुंबई यांचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित झाले नाहीत. त्याचे कारण त्यांनी 23 नोव्हेबर 2010 च्या पत्राने राज्य माहिती आयोगास कळविले की सदरची सुनावणीची नोटीस दि. 23.11.2010 रोजीच त्यांचे विभागाकडे प्राप्त झाली. म्हणून सुनावणीची नोटीस उशिरा प्राप्त झाल्यामुळे सुनावणीसाठी हजर राहणे शक्य होत नाही

असे आयोगास कळविले. म्हणून नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरुन संबंधिताचे म्हणणे एकुन घेण्यासाठी पुढील सुनावणी दि. 4.1.2011 रोजी ठेवण्यात आली. दि. 4.1.2011 च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. तसेच उत्तरवादी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री डी.एस.घिनमिने आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई श्री एम. आर. भोंडवे हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज देवून दि. 20.2.2007 च्या पत्रावर व्यवस्थापकीय संचालक व मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) यांच्या अभिप्रायाची साक्षांकित प्रत तसेच त्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती इत्यादी संदर्भात 1 ते 7 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. प्रकाशगड, वांद्रे(पूर्व) मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की माहितीच्या अधिकारा खाली त्यांनी दि. 9.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई यांचेकडे दि. 20.2.2007 च्या त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या बाबत 1 ते 7 मुद्यांची माहिती मागितलेली आहे. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असेही सांगितले की दि. 20.2.2007 ची तक्रार ही व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई यांचेकडे पंजीबध्द डाकेने पाठविलेली होती. त्या संदर्भात महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनीला ही तक्रार मिळाल्याची पोच त्यांनी आयोगा समोर आज दाखविली. सदरची तक्रार महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनीस प्राप्त होवूनही त्या तक्रारीवर महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनीने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दोषी अधिका—यावर कार्यवाही करावी असे आग्रही प्रतिपादन अपीलकर्ता यांनी आयोगा समोर आजच्या सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असेही नमुद केले की त्यांनी प्रथम अपील दाखल करुनही त्यांना अपेक्षित माहिती अद्याप मिळालेली नाही. त्याची सुनावणी देखील घेतलेली नाही. यावरुन महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनीचा कारभार हा गोंधळ निर्माण करणारा आहे असे दिसून येते. त्यामुळे त्यााबत कार्यवाही व्हावी असेही त्यांनी नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 9.5.2007 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 14.5.2007 रोजी

प्राप्त झाला. सदरच्या अर्जात नमुद केलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. त्यावेळी त्यांना असे दिसून आले की अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 चा तक्रार अर्ज व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. त्यापृष्टयर्थ त्यांनी व्यवस्थापकीय संचालकाच्या कार्यालयातील मुळ आवक रजिस्टर दाखविले. त्या मुळ आवक रजिस्टरमध्ये अर्जाचा दिनांक 20.2.2007 असल्यामुळे त्या दिनांकापासून पुढे एक महिन्याचे टपालाद्वारे आलेल्या सर्व टपालाचा शोध घेण्यात आला असता त्यामध्ये अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 चा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दि. 19.5.2007 च्या पत्राने दि. 20.2. 2007 च्या तक्रार अर्जाची प्रत त्वरीत पाठवावी म्हणजे त्या अर्जाच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देता येईल. सदरचे पत्र त्यांनी टपालाद्वारे साध्या पोस्टाने अपीलकर्त्यास पाठविल्याचे नमूद केले. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमूद केले. मात्र सदरचे पत्र टपालाद्वारे issued म्हणून पाठविल्याचे दिसून येते. यावर अपीलकर्ता यांनी असे नमूद केले की दि. 20.2.2007 चा तक्रार अर्ज त्यांनी पंजीबध्द डाकेने यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मुंबई यांचेकडे पाठविलेला असून ती डाक महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनीस प्राप्त झाल्याचे पोस्टाची पोच त्यांनी आयोगा समोर सुनावणीत दाखविले. तथापी अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 चा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन दिल्यास त्यावर विज निर्मिती कंपनी मार्फत त्वरीत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले. म्हणून आज आयोगा समोर अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांचेकडील दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जाची प्रत उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्याच्या दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जावर विज निर्मिती कंपनीने योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व योग्य होईल. तथापी अपीलकर्त्याने दि. 20.2.2007 चा तक्रार अर्ज पंजीबध्द डाकेने विज निर्मिती कंपनीकडे पाठविलेला असून तो अर्ज विज निर्मिती कंपनीकडे प्राप्त झाल्याची नोंद दिसून येते. म्हणून सदर अर्ज कोणाकडे प्राप्त झालेला आहे याचा शोध जन माहिती अधिकारी यांनी घ्यावा आणि सदरचा अर्ज प्राप्त झाला असल्यास तो कार्यवाहीसाठी योग्य त्या विभागाकडे का सादर केलेला नाही याची जबाबदारी चौकशी करुन निश्चित करावी आणि जबाबदार असणा–या कर्मचा–यावर त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणे देखील योग्य होईल.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महाराष्ट्र राज्य विज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई श्री एम. आर. भोंडवे हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 21.6.2007 चा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 18.7.2007 रोजी प्राप्त झाला. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही. मात्र

प्रथम अपीलीय अधिकारी यानी अपीलकर्त्यास दि. 30.7.2007 रोजी पत्र पाठवून अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जाची प्रत प्राप्त झाली नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई करता आली नाही तरी दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जाची प्रत त्वरीत पाठविण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जाची प्रत त्यांना पाठविली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. वास्तविक पाहता प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर माहिती अधिकाराच्या नियमाप्रमाणे त्यावर सुनावणी होवून 30 दिवसाच्या मुदतीत किंवा कारणे देवून 45 दिवसाच्या मुदतीत अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. म्हणून भविष्यात याची पुनरावृत्ती होणार नाही याची सक्त ताकीद प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 चा मुळ तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्या. मुंबई यांचेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याने दि. 20.2.2007 च्या तक्रार अर्जाची प्रत आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांनी दि. 9.5.2007 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याच्या आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा दि. 20.2.2007 च्या मुळ तक्रार अर्जावर योग्य ती चौकशी करुन कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलकत्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावा.

2) अपीलकर्ता यांचा दि. 20.2.2007 चा मुळ तक्रार अर्ज महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्या. मुंबई यांचेकडे रजिस्टर पोस्टाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणून सदरच्या अर्जा संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कसून शोध घेवून तो अर्ज प्राप्त झाला असल्यास सदरचा अर्ज कार्यवाहीसाठी का सादर करण्यात आला नाही याची चौकशी करुन संबंधित कर्मचा–यावर जबाबदारी निश्चित करावी

आणि जबाबदारी निश्चित करुन त्या कर्मचा–या विरुध्द त्याला लागू असलेल्या सेवा शर्ती नियमा प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1222-1226

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**ज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1540 नाग/2010**

श्री हेमराज केशवराव खुसपरे
सचिव, ओम साईनाथ बाबा ग्रामीण विकास शिक्षण विद्या प्रसारक मंडळ,वाकी
मु. पो. वाकी ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ना. ऊ. रौराळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.1.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन यशवंत बाबा शिक्षण संस्था बिचवा या संस्थेने वाकी येथे शाळा चालू करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत तसेच सदर प्रस्तावावर जिल्हा स्तरीय आणि राज्य स्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाची प्रमाणीत प्रत इत्यादीची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपसचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. तथापी अपेक्षीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की दि. 3.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज देवून यशवंत बाबा शिक्षण

संस्था बिचवा या संस्थेने वाकी येथे शाळा चालू करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबतच्या प्रस्तावाची प्रत आणि सदरच्या प्रस्तावावर जिल्हा स्तरीय आणि राज्य स्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाची प्रमाणीत प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.5.2007 च्या पत्राने अपीलकर्ता यांना पत्र लिहून माहिती नेमकया कोणत्या शाळे संदर्भात आहे हे त्वरीत कळविण्याबाबत कळविले होते. मात्र अपीलकर्ता यांनी त्या संदर्भात माहिती न देता उपसचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर अपीलकर्ता यांना फेरपडताळणी अहवाल उपलब्ध करुन देण्यात आला. मात्र त्याबाबत इतर कागदपत्रा संदर्भात त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. 4.1.2010 रोजी पुन्हा प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाला अनुसरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांना दि. 12.3.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. मात्र शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री पी. एन. बहुरे सहाय्यक हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव श्री ना. ऊ. रौराळे हे हजर होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास असे आणून दिले की अपीलकर्त्याला यापूर्वीच त्यांच्या मागणीप्रमाणे फेरतपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. मात्र इतर कागदपत्रे शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांना अपीलकर्त्यास सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास कळविण्यात आलेले आहे. आजच्या सुनावणीस शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर हे देखील हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती ही शाळेशी संबंधित होती. त्यामुळे शाळे कडून सदरची कागदपत्रे आता प्राप्त झालेली आहे आणि आयोगा समोर अपीलकर्त्यास विनामुल्य ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांनी दाखविली.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती मागण्याच्या अर्जाप्रमाणे फेरतपासणीचा अहवाल त्यांना प्राप्त झालेला आहे. मात्र शाळा चालू करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबतच्या प्रस्तावाची प्रत तसेच बॅंकेमध्ये पैसे भरल्याची पोच पावतीची प्रत ही माहिती मिळालेली नाही. तथापी सदरची माहिती आता संबंधित शाळेकडून शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे उपलब्ध झालेली असल्यामुळे आयोगा समोर सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती मिळाल्याबाबत अपीलकर्ता यांनी समाधान व्यक्त करुन पोच दिली. यावरुन अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती आयोगा समोर उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1228-1230

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1446 नाग/2010**

श्री पृथ्वीराज झंडबाजी मेश्राम
न्यु खलासी लाईन, कामठी,
वार्ड नं. 7 कोचर के बंगले पिछे
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बोरकर
जन माहिती अधिकारी तथा अभियंता
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.1.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन वार्ड नं. 7 कोचर यांच्या बंगल्या मागे श्री पुरुषोत्तम जगन रंगारी यांच्या घरापासून रोड तयार करण्यास सुरुवात झालेली आहे त्या संदर्भात रोड मंजुरीच्या प्रस्तावाची प्रत, वर्क ऑर्डर आणि एस्टिमेट इत्यादीची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच श्री गेडाम यांच्या घरापासून सुरु होणा–या कामाबाबतची माहिती देखील मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता व्यक्तीशः घेणार असे माहितीच्या अर्जात नमूद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 4.10.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्या माहिती मध्ये रोड बाबतची वर्क ऑर्डर त्याचप्रमाणे शेडयुल बी मध्ये एस्टिमेटची प्रत आणि कंत्राटदाराला दिलेल्या पेमेंटचे बीलची प्रत इत्यादीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी या माहिती मुळे

अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 2.11.2010 ला ठेवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता त्या सुनावणीस उपस्थित झालेले नाही म्हणून माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे प्रथम अपील फेटाळलेले दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता जन माहिती अधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे त्यांनी दि. 20.5.2010 च्या माहितीच्या अर्जा प्रमाणे माहिती मागितलेली होती. त्या अर्जाच्या अनुषंगाने सदरची माहिती यक्तीशः घेणार असल्याचे नमुद केलेले होते. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 4.10.2010 च्या पत्राने त्यांच्या घरी माहिती पाठविली होती. ती माहिती त्यांना प्राप्त झाली तरी त्या माहिती मुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 2.11.2010 ला ठेवण्यात आली होती. मात्र त्यांनी केवळ अर्ज देवून सुनावणीस हजर झाले नाही असे त्यांनी सुनावणीत असे नमुद केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 20.5.2010 चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 21.5.2010 रोजी प्राप्त झाला. अर्जाच्या अनुषंगाने माहिती काढण्यात आली. सदरच्या माहितीमध्ये रोडचे काम सुरु केल्याबाबतच्या वर्क ऑर्डरचा आदेश तसेच शेडयुल बी मध्ये एस्टिमेटची प्रत आणि कंत्राटदाराला दिलेल्या पेमेंटचे बीलची प्रत इत्यादीची माहिती तयार केली. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी यक्तीशः मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्यास ती माहिती घेवून जाण्यासाठी कळविण्यात आले. मात्र अपीलकर्ता ती माहिती घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित झाले नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अपीलकर्ता यांच्या घरी दि. 4.10.2010 च्या पत्राने पाठविली. अपीलकर्त्याच्या घरी दि. 5.10.2010 रोजी माहिती देण्यात आली. त्याबाबतची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली. तथापी प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना नमूद केलेली माहिती मिळाली असली तरी त्यांच्या घरा समोर त्यापुर्वी रोड का तयार झालेला नाही याची माहिती त्यांना पाहिजे होती ती माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की अपीलकर्ता यांच्या घरा पासून पुढे रोड का तयार झालेला नाही याची माहिती उपलब्ध करुन देता येईल. म्हणून अपीलकर्त्यास त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कामठी हे उपस्थित होते. अपीलकर्त्याचे प्रथम अपीला त्यांचेकडे दि. 6.8.2010 रोजी

प्राप्त झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 2.11.2010 ला ठेवण्यात आली होती. मात्र सदरच्या सुनावणीच्या दिवशी अपीलकर्ता कार्यालयात येवून केवळ अर्ज दिला. मात्र प्रत्यक्ष सुनावणीस मुख्याधिकारी समोर हजर झाले नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढल्याचे सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांना त्यांच्या घरापासून पुढे रोडचे काम का करण्यात आलेले नाही याची माहिती पाहिजे आहे म्हणून त्यांच्या घरा पासून रोडचे पुढील काम का झालेले नाही याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या घरा पासून रोडचे पुढील काम का झालेले नाही याबाबतची माहिती कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1232-1234

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1429 नाग/2010**

श्री राजु राघोजी जाधव
क्वार्टर नं. 8/सी, राज्य कामगार विमा योजना दवाखाना,
गणेशपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
राज्य कामगार विमा योजना, मुंबई
एम.जी.एम. परेल, मुंबई 12.

2) जन माहिती अधिकारी
राज्य कामगार विमा योजना, मुंबई
एम.जी.एम. परेल, मुंबई 12. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 24.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीत हजर राहण्याचे आदेशित केलेले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 4.1.2011 रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर होते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे लेखी निवेदन सादर केले की जन माहिती अधिकारी राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचेकडून नियीमत पदेन्नती मिळाली त्यामुळे त्यांना माहितीची आता आवश्यकता नाही. म्हणून अपील खारीज करावी अशी विनंती केली. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1234-1235

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1546 नाग/2010**

श्री प्रा. हिंमतराव वामनराव आढवळे
मु. पो. भारसिंगी
ता. नरखेड जि. नागपूर 44 1305 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती स्मीता नागणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
काटोल ता. काटोल जि. नागपूर
2) श्री एस. डी. सोळंके
जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार
पोलीस स्टेशन जलालखेडा
ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गैरअर्जदार गोपाळ नारायणराव इंगळे आणि अनुराधा गोपाळ इंगळे तसेच कु. सुजाता गोपाळ इंगळे रा. भारसिंगी यांचे विरुध्द त्यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे दिलेल्या दि. 14.9.2009, 21.9.2009, 22.1.2010 व 26.1.2010 रोजी विहित तक्रार अर्जान्वये रिपोर्ट दिलेला होता. परंतू रिपोर्टवर केलेल्या कार्यवाहीची मागणी त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली केलेले दिसून येते. तसेच दि. 3.6.2010 ला दिलेल्या रिपोर्टची प्रत तसेच त्यांना मारहाणीत झालेल्या जखमेबाबत डॉक्टरांनी केलेल्या तपासणीच्या अहवालाची प्रत इत्यादी कागदपत्रे माहिती मागितलेली दिसून येतात. तथापी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडून माहिती प्राप्त झाली. त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडे दि. 10.8.2010 रोजी दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या दि. 26.8.2010 च्या उत्तराने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 22.7.2010 रोजी अर्ज सादर करुन वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना माहिती जन माहिती अधिकारी यांनी न देता उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडून दि. 26.8.2010 रोजी माहिती प्राप्त झाली. मात्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 14.9.2009, 21.9. 2009, 22.1.2010, 26.1.2010 व 3.6.2010 अशा विविध दिनांकांना रिपोर्ट दिलेले होते. त्या प्रत्येक रिपोर्टवर काय कार्यवाही झाली याची माहिती त्यांना पाहिजे होती मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तारीखवार दिलेल्या रिपोर्टवर कार्यवाही न कळविता दि. 26.8.2010 च्या पत्राने प्रतिबंधात्मक कार्यवाही बाबत केळविलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 26.1.2010 च्या रिपोर्टच्या संदर्भात केलेल्या पंचनाम्याची प्रत आणि त्यांच्या जखमेबाबत डॉक्टरांनी केलेल्या तपासणीच्या अहवालाची प्रत याची माहिती देखील त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. आणि ही कागदपत्रे मला उपलब्ध करुन द्यावी असे आग्रही प्रतिपादन आयोगा समोर केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे पोस्टाद्वारे दि. 22.7.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाची माहिती काढण्याची कारवाई सुरु असतांना अपीलकर्त्याने उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडे मुदतीच्या आधीच प्रथम अपील म्हणजे दि. 10.8.2010 रोजी दाखल केले. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 12.8.2010 रोजी ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा यांचेकडे पाठविला आणि त्या पत्रात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती 5 दिवसात उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचे कार्यालयाकडे पाठविण्याच्या सुचना दिल्या.

5. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल दि. 12.8.2010 च्या पत्रातील सुचनांना अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची छाननी केली आणि तसेच सविस्तर अहवाल उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडे दि. 26.8.2010 रोजी दाखल पाठविला.

6. जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा यांचेकडून उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांचेकडे त्यांनी पाठविलेला दि. 26.8.2010 चा अहवाल त्यांचे कार्यालयाकडे दि. 26.8.2010 लाच प्राप्त झाला आणि त्यांनी त्याच

दिवशी म्हणजे दि. 26.8.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दि. 26.8.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास अशी माहिती उपलब्ध करुन दिली की गैरअर्जदार गोपाळ नारायणराव इंगळे आणि अनुराधा गोपाळ इंगळे तसेच कु. सुजाता गोपाळ इंगळे रा. भारसिंगी यांचे विरुध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे दिलेल्या रिपोट वरुन चौकशी अंती गैरअर्जदार यांचेवर इस्तगासा क्र. 80/10 कलम 107, 116 (3) जा. फौ. अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करुन इस्तगासा तहसिलदार जलालखेडा यांचे कोर्टात दाखल करण्यात आला. चौकशी संबंधाचे सर्व कागदपत्र तहसिल कोर्ट जलालखेडा येथे सादर केलेले आहे अशी अपीलकत्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी वेगवेगळया तारखांना जे रिपोर्ट दिलेले आहे त्या प्रत्येक तारीखनिहाय रिपोर्टवर केलेल्या कार्यवाहीची त्यांना माहिती पाहिजे आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की भरण्याबाबतचे वेगवेगळया तारखांना जे रिपोर्ट दिले आहे त्या सर्व रिपोर्टच्या आधारावरच एकत्रित कारवाई म्हणजे तहसिलदार जलालखेडा यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे. म्हणजे अपीलकर्त्याच्या वेगवेगळया तारखांच्या दिलेल्या रिपोर्टवर ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे असे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्यास त्यांना झालेल्या जखमेबाबतचा डॉक्टरांच्या तपासणीचा एम एल सी रिपोर्टची प्रत आणि दि. 26.1.2010 च्या रिपोर्टच्या पंचनाम्याची प्रत ही कागदपत्रे तहसिलदार जलालखेडा यांच्या कार्यालयाकडे प्रतिबंधात्मक कारवाईच्या प्रस्तावासोबत दाखल केल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमुद केले आहे. म्हणून अपीलकत्यास दि. 26.1.2010 चा रिपोर्ट व पंचनाम्याची प्रत आणि एम एल सी रिपोर्टची प्रत इत्यादी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन घेवून अपीलकत्यास पाठविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी वेगवेगळया तारखांना दिलेल्या रिपोर्टच्या संदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई एकत्रिक केलेली आहे असे स्पष्टपणे अपीलकत्यास जन माहिती अधिकारी यांनी कळवावे तसेच दि. 26.1.2010 च्या रिपोर्टची प्रत आणि पंचनाम्याची प्रत किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती आणि डॉक्टरांच्या तपासणीचा एम एल सी रिपोर्टची प्रत

इत्यादी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1236-1239

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1551 नाग/2010**

श्री प्रविण पुंडलिकराव राऊत
365, सहयोग नगर, नारी रोड, नागपूर
पोस्ट उप्पलवाडी ता. जि. नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
जिल्हा परिषद कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग–3 (कृषि) संवर्ग कर्मचा–याची जेष्ठता सूची बाबत एकुण 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.6.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपकार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांच्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जला अनुसरुन त्यांना जन

माहिती अधिकारी यांनी दि. 25.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची माहिती अपुर्ण असून त्यांना पाहिजे असलेली माहिती त्यामध्ये नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. 19.7.2010 रोजी दाखल केले. सदरचे प्रथम अपील उपकार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केले. तथापी सदरचे अपील हे कृषि विभागाशी संबंधित असल्यामुळे कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दि.9.8.2010 रोजी हस्तांतर केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.30.8.2010 रोजी सुनावणी घेवून निर्णय दिला. मात्र सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सहा. माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 10.6.2010 रोजी प्राप्त झला. सदरच्या अर्जात मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची होती. तथापी जी माहिती त्यांचेकडे उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास दि. 25.6.2010 रोजी पाठविलेली आहे.

5. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद वर्धा हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दि.9.8.2010 रोजी प्राप्त झले. त्या अपीलाची सुनावणी दि.30.8.2010 रोजी घेण्यात आली. आणि दि.30.8.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला. सदरच्या निर्णयात सन 2004 पासून जेष्ठता सूची अबाधित ठेवण्यात आली. तरी सुध्दा विभागानी नियम तपासून त्याप्रमाणे पुढील अंतीम जेष्ठता सूची अद्यावत करुन घ्यावी असा निर्णय दिला. मात्र अद्याप पर्यंत अंतीम जेष्ठता सूची तयार झालेली नाही. सदरचे काम सद्या सुरु आहे. असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या 1 ते 6 मद्यांपैकी काही मुद्दे हे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहेत. मात्र जेष्ठता सूची बनविण्याचे नियम किंवा त्याबाबत असलेले परीपत्रक अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचीत आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलात दिलेल्या निर्णयाप्रमाणे अंतीम जेष्ठता सूची अद्यावत करुन घेवून त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जेष्ठता सूची बनविण्याचे नियम अथवा परीपत्रक विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 30.8.2010 रोजी दिलेलया प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अंतीम जेष्ठता सूची अद्यावत करुन घ्यावी व त्यानंतर अपीलकर्त्यास त्याची माहिती पुरवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1240-1242

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1550 नाग/2010**

श्री प्रविण पुंडलिकराव राऊत
365, सहयोग नगर, नारी रोड, नागपूर
पोस्ट उप्पलवाडी ता. जि. नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. जवळेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा (विकास शाखा) विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांना निलंबित करण्याच्या प्रकरणाबाबत 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की ते जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत पंचायत समिती सेलू येथे कृषि अधिकारी या पदावर कार्यरत आहे. तथापी त्यांना काही कालावधीसाठी निलंबित करण्यात आले होते आणि त्या अपीलाच्या संदर्भात त्यांनी 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाली मात्र त्यांचा निलंबनाचा कालावधी हा अकार्यदीन करण्याबाबत घेतलेला निर्णय ज्या पुराव्याच्या आधारे घेतला त्याची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. म्हणन ती माहिती त्यांना उपलब्ध होणे आवश्यक आहे असे

आग्रही प्रतिपादन त्यांनी आयोगासमोर केले. हा मुद्या सोडला तर बाकी मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने त्यांच्या सहाय्यक सौ. धपारे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) श्री राजीव जवळेकर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज केले असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा सेवाबाहय कालावधी नियमित करण्याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील दि. 22 एपिल 2010 च्या पत्राने विभागीय आयुक्त नागपूर यांना असे कळविलेले आहे की अपीलकर्ता यांचा सेवाबाहय कालावधी नियमित करण्याची कार्यवाही महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी निलंबन) नियम 1981 च्या नियम 70 मधील तरतुदीप्रमाणे करावी. शासनाच्या या सुचना प्रमाणे नियम 70 प्रमाणे विभागीय आयुक्तांनी अपीलकर्ता यांचा सेवाबाहय कालावधी हा अकार्यदीन ठरविलेला आहे. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सेवाबाहय कालावधी हा अकार्यदीन ठरविण्याची कार्यवाही योग्य नाही. म्हणून विभागीय आयुक्तांनी नियम 70 अन्वये केलेली कार्यवाही अपीलकर्त्यास मान्य नसल्यास अपीलकर्त्याने योग्य त्या न्यायाधिकरणाकडे अर्ज करणे योग्य आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1244-1245

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1552 नाग/2010

श्री प्रविण पुंडलिकराव राऊत
365, सहयोग नगर, नारी रोड, नागपूर
पोस्ट उप्पलवाडी ता. जि. नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव (आस्था–12)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, पोटमाळा
मंत्रालय, मुंबई–12

2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (आस्था–12)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, पोटमाळा
मंत्रालय, मुंबई–12 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता सुनावणीस हजर होते

2. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की दि. 6.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे लेखी निवेदन सादर केले की जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई–12 यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करावे अशी विनंती केली. त्यामुळे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1246-1247

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1463 नाग/2010

श्री प्रकाश दगडू भारंबे
के.ऑफ किशोर मुंजनकर
7–अ साटोने लेआऊट, गिताई नगर
धुनिवाले मठासमोर, नागपूर रोड, वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. ना. कांबळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(पदुम)
पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र दि. 3.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकार गैरहजर होते. म्हणून पुढील सुनावणी दि. 12.1.2011 रोजी ठेवण्यात आली. दि. 12.1.2011 च्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने निवड केलेले श्री हेमंत गुलाबराव गडवे व श्री रणजितकुमार लालसिंग राठोड हया दुग्ध व्यवसाय विभागातील महाव्यवस्थापक/उपदुग्धशाळा व्यवस्थापक पदासाठी त्याचा अनुभव अग्राहय नमुद केला असूनही हे दोन्ही अधिकारी दुग्ध व्यवसाय विकास विभागात कार्यरत आहे. त्यांचेवर कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याची माहिती आणि महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने निवड जाहीर केलेल्याा 7 उमेदवारांपैकी 4

उमेदवाराचा या पदासाठी सेवाभर्ती नियमा नुसार अनुभव अग्राहय असल्याबाबत आयोगाला कळविण्यात आले आहे काय. असल्यास त्याचे कागदपत्र अपीलकर्ता यांने मागितलेली दिसून येतात. मात्र विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.8.2010 रोजी उपसचिव(पदुम) मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि. 7.1.11 च्या पत्रान्वये याबाबत सविस्तर अहवाल दिलेला असून त्यांनी त्यात असे नमुद केले आहे की त्यांच्या उजव्या पायास स्कुटर अपघातामुळे फॅक्चर झाल्याने वद्यकीय उपचारा नंतर दीर्घ प्रवास करु नये असे शल्य चिकित्सकानी प्रमाणीत केले असल्यामुळे ते नागपूर येथे उपस्थित राहण्यास असमर्थ आहे. त्याबाबत त्यांनी शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यांनी या लेखी अहवालात असेही नमुद केले आहे की अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची नस्तीची अन्य विभागाच्या अभिप्रायात सादर झालेली असल्याने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करता येत नसल्याचे कळविले आहे. तसेच अपीलकर्ता यांना महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने दुग्ध व्यवसाय विकास विभागातील गट– अ संवर्गातील रीक्त पदाच्या भरतीमध्ये अपात्र ठरविल्यामुळे त्यांनी आता आयोगास प्रतिवादी करुन महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण नागपूर येथे आव्हान अर्ज क्र. 533/2009 दाखल केलेला असून त्या अर्जाच्या निमित्ताने अपीलकर्ता आयोगाने शासनास शिफारस केलेल्या उमेदवाराबाबतची कागदपत्राच्या प्रती माहिती कायद्या अंतर्गत मागवीत आहे तथापी सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(पदुम) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याने त्यांचेकडे दि. 26.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 9.9.2010 रोजी ठेण्यात आली होती. परंतू रेल्वेचे आरक्षण मिळाले नाही या कारणास्तव अपीलकर्ता सुनावणीस हजर झाले नाही. म्हणून पुन्हा सुनावणी दि. 22.12.2010 रोजी ठेवली होती. परंतू अपीलकर्ता हजर राहिले नाहीत. मात्र यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 22.12.2010 ची सुनावणी ही दि. 14.10.2010 च्या अपीलाच्या संदर्भात होती. दि. 26.8.2010 च्या अपीलाच्या संदर्भात नव्हती आणि दि. 14.10.2010 च्या अपीलाची सुनावणी या पूर्वीच दि. 20.11.2010 रोजी झालेली होती व त्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. मात्र दि. 26.8.2010 च्या अपीलाची सुनावणी नसल्यामुळे अपीलकर्ता उपस्थित राहिले नाही असे त्यांनी नमूद केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमूद केले की दि. 22.12.2010 ची सुनावणी दि. 26.8.2010 च्या अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलावर होती. मात्र चुकून नोटिसीमध्ये दि. 14.10.2010 चा अपीलाचा संदर्भ देण्यात आला आहे. सदरची चुक ही टायपींग मिस्टेक आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमूद केले.

5. तथापी अपघातामुळे जन माहिती अधिकारी हे सुनावणीस उपस्थित राहण्यास असमर्थ असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(पदुम) यांनी आयोगापुढे अपीलकर्त्यास त्यांच्या कडील दि. 19.7.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती त्यांनी आता तयार केली असून सदरची माहिती अपीलकर्त्यास आयोगा समोर देण्याचे मान्य केले आणि सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा समोर उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1246-1248

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1555 नाग/2010

सौ. मंगला रामकृष्णजी कांबळे
संत तुकडोजी वार्ड, नंदोरी रोड,
शिल नगर बोर्ड जवळ, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
बालमंदिर संस्था, हिंगणघाट
बालमंदिर उच्च प्राथमिक संस्था, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) सौ. कुसुम अशोकराव गुजरकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
बालमंदिर उच्च प्राथमिक संस्था, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 12.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. दि. 12.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बालमंदिर उच्च प्राथमिक संस्था, हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा हया हजर आहेत. तसेच अपीलकर्ता हया हजर आहेत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव हे गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2010 रोजी व दि. 28.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बालमंदिर उच्च प्राथमिक संस्था, हिंगणघाट यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खालील चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1. थकबाकी वेतनवाढीचे बिल मंजूर न होण्याची कारणे. 2. वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मंजूर न करण्याची कारणे. 3. वैद्यकीय कारणास्तव अर्जित रजेचे वेतन अदा न करण्याची कारणे. 4. परावर्तीत रजेचा पगार काढला नसण्यची कारणे इत्यादी माहिती

मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी त्यांचेकडील दि. 14.5.2010 च्या पत्राने आणि दि. 23.7.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना उत्तर देवून माहिती अधिकाराच्या व्याख्येनुसार सदरची माहिती नसल्यामुळे व विचारलेली प्रश्नोत्तरे हया अभिलेखात येत नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांचे या माहिती बाबत समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. तथापी उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद वर्धा यांनी त्यांचेकडील दि. 29.7.2010 च्या पत्राने आणि दि. 6.8.2010 च्या पत्राने सदरचे प्रथम अपील सचिव बालमंदिर संस्था, हिंगणघाट यांचेकडे पाठवून ते या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी असल्याचे नमूद करुन अपीलार्थीस माहिती देण्यात यावी असे उपशिक्षणाधिकारी यांनी कळविलेले आहे. मात्र त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमूद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बालमंदिर उच्च प्राथमिक संस्था, हिंगणघाट सौ. कुसुम अशोकराव गुजरकर हया उपस्थित होत्या. त्यांनी असे नमुद केले की सदर शाळेवर पुर्वी मुख्याध्यापिका म्हणून सौ. चंदा मोरेश्वर जिन्नेवार हया होत्या. तथापी त्यांनी दि. 1.1.2011 पासून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारल्यामुळे त्या आता सेवेत नाहीत. म्हणून सौ. गुजरकर हया दि. 10.1.2011 पासून मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे त्या सद्या जन माहिती अधिकारी म्हणून आहेत. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की पूर्वीच्या मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्तीस दि. 14.5.2010 च्या पत्राने व दि. 23.7.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की अपीलकर्ती यांनी मागितलेली माहिती ही माहिती अधिकाराच्या व्याख्येत बसत नाही तसेच प्रश्नार्थक स्वरुपात माहिती आहे म्हणून अभिलेख स्वरुपात माहिती नसल्यामुळे ते उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ती यांनी वर नमुद केल्याप्रमाणे चार मुद्यांबाबत माहिती मागितलेली आहे आणि चारही मुद्यांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. त्यामुळे केवळ माहिती अधिकाराच्या व्याख्येमध्ये मागितलेली माहिती येत नाही व प्रश्नार्थक स्वरुपात माहिती आहे हे मुख्याध्यापिकेनी नमूद केलेले कारण अयोग्य व चुकीचे आहेत. म्हणून अपीलकर्तीस त्यांनी वरील चार मुद्यांवर मागितलेल्या माहितीच्या वस्तुस्थिती बाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे न्यायोचीत व संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून विद्यमान मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत खालील मुद्यांवर केलेली कार्यवाही विनामुल्य यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. 1. थकबाकी वेतनवाढीचे बिल मंजूर न होण्याची कारणे. 2. वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मंजूर न करण्याची कारणे. 3. वैद्यकीय कारणास्तव अर्जित रजेचे वेतन अदा न करण्याची कारणे. 4. परावर्तीत रजेचा पगार काढला नसण्यची कारणे. तसेच विद्यमान मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस वरील माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1250-1252

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1559 नाग/2010**

श्री देविदास विष्णुजी काटोले
पार्वती पार्क 64/बी, वानाडोंगरी
पो. वानाडोंगरी हिंगणा रोड नागपूर 441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. सी. सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. डी. शूने प्रमुख लिपीक
जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तालुका निरीक्षक भूमी अभिलेख नरखेड यांचेकडील प्रस्ताव क्र. तअ/एस व्ही 23/एसआर 35/1/26 दि. 28.3.2001 च्या पत्राप्रमाणे प्रसताव सादर केलेला आहे. त्या प्रस्तावातील दस्तऐवजाच्या प्रतीची मागणी केलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 11.8.2010 च्या पत्राने प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात दिसून येत नसून त्याचा शोध घेणे सुरु आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते. तथापी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया अपीलानंतरही त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 22.6.2010 रोजी अर्ज करुन वर नमुद माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.8.2010 च्या पत्राने त्यांना उत्तर देवून असे कळविले की दि. 28.3.2001 चा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात दिसून येत नाही. तथापी अर्जाचा शोध घेणे सुरु आहे माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तावाचा शोध घेवून माहिती अपीलकर्त्यास पुरवावी असे आदेश दि.5.10.2010 रोजी केले होते मात्र त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या दि. 22.6.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांनी मागितलेल्या माहितीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला तथापी सदरचे प्रकरण हे सन 2001 चे असल्यामुळे जुने प्रकरण आहे. तसेच सदरचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही म्हणून त्या प्रस्तावाचा शोध घेणे सुरु आहे अशी माहिती त्यांनी अपीलकर्त्यास दि. 11.8.2010 रोजी कळविलेले आहे.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 26.8.2010 रोजी दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.9.2010 रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता देखील हजर होते. त्यांचे म्हणणे एकून घेवून जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घेवून कागदपत्र उपलब्ध करुन देण्याचा निर्णय प्रथम अपीलात दि.5.10.2010 रोजी दिलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा त्या प्रस्तावाचा शोध घेतला तथापी अद्यापही तो प्रस्ताव मिळालेला नाही. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागपूर त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की सदरच्या प्रस्तावाचा शोध त्यांच्या कार्यालयात घेण्यात आला. मात्र तो प्रस्ताव अद्याप मिळालेला नाही. तथापी सदरचा प्रस्ताव प्राप्त करण्यासाठी उप अधिक्षक भूमी अभिलेख नरखेड यांच्या कार्यालयात पत्रव्यवहार करुन प्राप्त करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच त्यांच्या कार्यालयात या प्रस्तावाचा पुन्हा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 2001 मधील आहे. म्हणजे सदरची माहिती सुमारे 10 वर्षा पूर्वीची आहे. त्या माहितीचा जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यानी त्यांच्या

कार्यालयात शोध घेण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे सुनावणीत नमूद केले. तसेच उप अधिक्षक भूमी अभिलेख नरखेड या कार्यालयाकडे सदरचा प्रस्ताव मिळण्यासाठी पत्रव्यवहार करण्याचे सुनावणीत सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध होण्यासाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या प्रस्तावाचा कसून शोध घ्यावा. तसेच उप अधिक्षक भूमी अभिलेख नरखेड यांच्या कार्यालयास देखील पत्रव्यवहार करुन प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी. आणि प्रस्ताव प्राप्त झाल्यास अपीलकर्ता उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1252-1254

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1561 नाग/2010**

श्री बबन रामकृष्णराव टाले
नेवटीया ले आऊट, नाचणगाव रोड, पुलगाव
पो. पुलगाव ता. देवळी जि. वर्धा 442302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री पदोपल्लीवार
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली
ता. अहेरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्यास पगारातून कपात केलेला प्रोत्साहन भत्ता व विशेष घरभाडे भत्ता कपात करण्याबाबत 1 ते 3 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्त्यास दि. 31.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रभारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केलले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 1.6.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली त्यांनी जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली यांचेकडे त्यांच्या प्रोत्साहन भत्ता व विशेष घरभाडे भत्ता बाबत 1 ते 3 मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही. 30 दिवसानंतर म्हणजे दि. 21.7.2010 च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती खोटी व अपुर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तथा प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली हे हजर होते. त्यांनी त्यांची बाजू मांडतांना असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 1.6.2010 रोजीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती काढण्याची कारवाई सुरु केली तथापी दि. 16.6.2010 रोजी त्यांचा रेल्वे प्रवासात अपघात झाला. त्यामुळे ते दि. 16.6.2010 पासून ते दि. 11.8.2010 या कालावधीत दीर्घ मुदतीच्या रजेवर होते. त्यांच्या रजेच्या कालावधीत त्यांच्या पदाचा पदभार श्री एम. बी. गायकवाड यांच्याकडे देण्यात आलेला होता. प्रभारी प्राचार्यांनी पदभार घेल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 8.7.2010 रोजी माहितीच्या सत्यप्रतीची फी रु. 20/– भरण्याकरीता पत्र दिलेले होते. त्यानुसार अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2010 रोजी माहितीची फी रु. 20/– भरणा केल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी माहितीची फी रु. 20/– ही दि. 8.7.2010 रोजी दिलेली होती. मात्र त्याबाबतचा कोणताही पुरावा ते आयोगा समोर दाखवू शकले नाही. अपीलकर्त्याने दि. 21.7.2010 रोजी फी चा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली यांच्या वतीने श्री के. पी. बांते हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे दि. 26.7.2010 चे प्रथपम अपील त्यांचेकडे दि. 2.8.2010 रोजी प्राप्त झाले आणि त्याची सुनावणी दि. 13.9.2010 रोजी घेण्यात आली आणि निर्णय दि. दि. 13.9.2010 रोजी देण्यात आल. सदरच्या निर्णयात अपीलकर्त्यास त्यांचा राजा मंजुरीचा प्रस्ताव हा सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर यांना सादर केलेला आहे. परंतू त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास देण्याबाबत निर्णय दिलेला होता. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या आस्थापनेवरुन प्रशिक्षणा करीता गेलेल्या कर्मचा–यांची नावे व त्यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रात्साहन भत्ता दिला असल्यास त्याबाबतची माहिती 15 दिवसात देण्याचा निर्णय दिलेला होता. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 19.10.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती

पाठविल्याचे दिसून येते. तथापी सदरचे पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्या पत्राची प्रत आज आयोगासमोर अपीलकर्त्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आणि ती माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीच्या फी चा भरणा केल्या नंतर दि. 21.7.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नुसार अपीलकर्त्यास त्यांच्या रजेचा प्रस्ताव सहसंचालक यांचेकडे दि. 29.6.2010 रोजी सादर केलेला आहे त्याची प्रत आयोगासमोर माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच जे कर्मचारी प्रशिक्षणासाठी गेलेले आहेत त्यांना दिलेल्या प्रोत्साहर भत्त्याची माहिती देखील उपलब्ध झालेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की त्यांची आर्वी येथे विनंती नुसार प्रतिनियुक्तीवर गेलेले आहेत. म्हणून प्रशिक्षणासाठी गेलेल्या कर्मचा–यांना ज्याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता व विशेष घरभाडे भत्ता देण्यात येत आहे तसाच त्यांनाही देण्यात यावा. तथापी सदरची बाब आयोगाच्या कार्यक्षेत्रात येत नाही त्यासाठी अपीलकर्त्याने योग्य त्या सक्षम अधिका–याकडे दाद मागणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1255-1257

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1562 नाग/2010

श्री शंकर किंसन बावणे
मु. गुंदोडा पो. केवाडा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हरीराम मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री कापसे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
ग्रामगिता आदिवासी आश्रम शाळा, गुंदोडा पो. केवाडा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ग्रामगिता आदिवासी आश्रम शाळा, गुंदोडा पो. केवाडा ता. चिमूर जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 1999 ते 2000पर्यंत मुख्याध्यापक ग्रामगिता आदिवासी आश्रम शाळा येथील शिक्षकेतर तथा कर्मचा–याच्या प्रमाणित हजेरी बुकची झेरॉक्स प्रत आणि सन 1999 ते 2001पर्यंत शिक्षक तथा कर्मचा–याचे पगार पत्रक यांच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या दिसून येतात. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या नंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की माहिती अधिकारा खाली दि. 17.7.2010 रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ग्रामगिता आदिवासी आश्रम शाळा यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे दोन

मुद्यांची माहिती मागितलेली होती. तसेच अपीलकर्ता हे दारीद्र रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पाहिजे आहे असे त्यांनी सुनावणीत असे नमुद केले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रु. 3000/— माहितीची फी भरण्याबाबत कळविले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना फी भरण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ग्रामगिता आदिवासी आश्रम शाळा, गुंदोडा पो. केवाडा ता. चिमूर जि. चंद्रपूर हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा दि. 17.6.2010 चा अर्ज त्यांचेकडे दि. 17.6.2010 ला प्राप्त झाला. त्या अर्जासोबत अपीलकर्त्याने सन 2002 ते 2007 या कालावधीचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले होते. मात्र सदरचे प्रमाणपत्र हे जुने असल्यामुळे व ते रद्य झाले असल्यामुळे अपीलकर्त्यास अद्यावत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर करण्याबाबत किंवा माहितीची फी रु. 3000/— भरणा करण्याबाबत दि. 17.8.2010 रोजी पत्राने कळविले होते. मात्र अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा माहितीची फी रु. 3000/— ही भरणा केले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चिमूर यांचेकडे प्रथम अपील दि. 3.9.2010 रोजी दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दि. 24.9.2010 रोजी घेण्यात आली. आणि निर्णय दि. 8.12.2010 रोजी देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. 8.12.2010 च्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्त्याने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र हे जुने जोडलेले असून ते रद्य झाले असल्यामुळे नव्याने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सन 2010 या वर्षासाठी लागू पडत असल्यास ग्रामपंचात कडून शहानिशा करुन अपीलकर्त्याने अवगत करावे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या निर्णयात असेही नमूद केले आहे की जन माहिती अधिकारी आणि अपीलकर्ता यांनी दि. 14.12.2010 रोजी कर्मचारी पगार वितरण रजिस्टरसह प्रकल्प कार्यालयात स्वतः उपस्थित राहून अपीलकर्त्यास त्यांच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रची खात्री करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची मुदत संपली असल्यास प्रमाणपत्र उपलब्ध करुन व त्याची शहानिशा करुन दारिद्रय रेषेखाली अपीलकर्ता नसल्यास झेरॉक्स पोटी लागणारा खर्च अपीलकर्त्याने भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी. तथापी अपीलकर्ता हे दि. 14.12. 2010 रोजी उपस्थित झाले नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दि. 14.12.2010 रोजी कर्मचारी पगार वितरण रजिस्टरसह प्रकल्प कार्यालयात हजर होते. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती पुरविता आली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी ते दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत सक्षम अधिका—याचे चालू वर्षाचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र प्राप्त करुन जन माहिती अधिकारी यांचेकडे 8 दिवसात सादर करावे. तथापी बी.पी.एल.चे प्रमाणपत्र त्यांना मिळाले नाही तर त्यांना आवश्यक असणा—या माहितीची फी भरुन घेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसाचे आंत दारिद्रय रेषेखालील सक्षम अधिका—याचा नवीन दाखला प्राप्त करुन जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करावा. तो सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती त्वरीत पुरवावी. तथापी अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील सक्षम अधिका—याचा नवीन दाखला सादर न केल्यास त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची अपीलकर्ता यांच्या कडून जन माहिती अधिकारी यांनी वाजवी फी भरुन घ्यावी आणि फी भरल्या नंतर आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1258-1260

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1572 नाग/2010**

सौ. सुशिला निळकंठराव नेवाळे
गणेशधाम सत्यम पॅराडाईज कॉलनी,
रो हाऊस नं. 10 हुडकेश्वर रोड नागपूर
ता. जि. नागपूर 440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
सा.प्र.विभाग, जिल्हा परिषद वाशिम
ता. जि. वाशिम
2) श्री सी. एन. पस्तापुरे
जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी
सा.प्र.विभाग, जिल्हा परिषद वाशिम
ता. जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.1.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.200 रोजी नोटीस काढून दि. 17.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी अद्याप न मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलात त्यांचे अपील खारीज केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांच्या वतीने त्यांचे पती श्री नेवाळे यांनी त्यांची बाजू मांडली. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांची पत्नी सौ. नेवाळे हया जिल्हा परिषद वाशिमच्या प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. तथापी त्यां सन 2006 मध्ये सेंवानिवृत्त झाल्या. मात्र त्यांना अद्याप सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी मिळालेली नाही म्हणून त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी अथवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी श्री पस्तापूरे हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. 2.8.2010 रोजीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 5.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 31.8.2010 रोजी उत्तर पाठविले. त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांनी

मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात बसत नाही असे कळविण्यात आले. मात्र आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी हे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता यांचा मुळ उद्येश त्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी का मंजुर झालेली नाही ही माहिती पाहिजे आहे. त्याला अनुसरुन अपीलकर्ता यांचा सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी मिळण्याचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे प्राप्त झाला होता. सदरचा प्रस्ताव दि. 15.1.2011 च्या आदेशान्वये मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्या मंजुरीच्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास आयोगा समोर उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळे आता अपीलकर्ती हिची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिलेली नाही असे त्यांनी अपीलात नमूद केले. म्हणून अपीलकर्त्यास आयोगा समोर आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1262-1263

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1576 नाग/2010

श्री भोगेलाल देवचंद बोहने
मु. पो. मुंडीकोटा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा,
सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा,
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने मु. सालेबर्डी ता. तिरोडा जि. गोंदिया यांच्या निवडणूकी संदर्भात जाती प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव दि. 29.3.2010 च्या पत्राप्रमाणे तहसिलदार तिरोडा यांच्या कार्यालयाकडून जिल्हाधिकारी गोंदिया यांचे मार्फत पाठविलेल्या प्रस्तावातील कागदपत्राच्या प्रतींची मागणी केलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की दि. 6.9.2010 रोजीच्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांच्या निवडणूकी संदर्भात जाती प्रमाणपत्र पडताळणी प्रस्तावात असलेल्या कागदपत्राची मागणी केलेली होती. सदरच्या मागणी नुसार त्रयस्थ पक्ष म्हणून श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत विचारणा केली असता श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांनी माहिती देण्यास संमती देवून देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. दरम्यानच्या काळात त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात 7 दिवसाचे आत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला होता. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगा समोर नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी प्रस्तूत प्रकरणी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 6.9.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन माहितीचा शोध घेण्यात आला. त्यामध्ये असे दिसून आले की अर्जदाराने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे दि. 20.9.2010 रोजी अपीलकर्ता यांना कळविले की आपण मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या पूर्व परवानगी शिवाय माहिती देता येणार नाही म्हणून श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांच्याकडून परवानगी प्राप्त होताच माहिती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तथापी या करीता कालावधी लागण्याची आवश्यकता आहे असेही अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले.

5. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले असे आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केले. अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 13.10.2010 ला प्राप्त झाला. त्याला अनुसरुन दि. 18.11.2010 रोजी अंतिम सुनावणी झाली आणि सुनावणी नंतर दि. 25.11.2010 रोजी निर्णय दिला. आणि त्या निर्णयात असे नमुद केले की 7 दिवसाचे आत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

6. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेतला. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास असे आणले की दि. 26.5.2010 रोजी जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाकडून जात पडताळणी बाबतचे 10 अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांचा देखील जात पडताळणीचा अर्ज होता मात्र सदरचा अर्ज हा अपुर्ण असल्यामुळे त्याच दिवशी तो अर्ज जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाकडे परत पाठविण्यात

आला. त्याचा पुरावा म्हणून आवक रजिस्टरची छायांकीत प्रत आयोगासमोर दाखविली. त्यावरुन असे दिसून येते की श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांचा जात पडताळणी बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाकडे परत केला असल्यामुळे अपीलकर्त्यास त्या प्रस्तावातील कागदपत्राची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.12.2010 रोजीच्या पत्राने लेखी कळविलेले आहे.

7. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असेही आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की त्यानंतर अपीलकर्ता आणि त्यांच्या पत्नी श्रीमती पुचफुला भोगेलाल बोहने यांचे जात पडताळणीचे प्रकरण पुन्हा जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे. सदरच्या प्रस्तावावर नियमा नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे त्यांनी आयोगा समोर स्पष्ट केले. मात्र अपीलकर्त्यास त्यांनी मागणी केल्याप्रमाणे या प्रस्तावात समाविष्ट असलेल्या एकुण 1 ते 50 कागदपत्राच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

8. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडे नव्याने प्राप्त झालेल्या जात पडताळणी प्रस्तावाच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1266-1268

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1574 नाग/2010

श्री गुरुदत्त जोगेन्द्रजी मेश्राम
31, झाडे ले आऊट, जयताळा, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. एम. ससाणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष कार्याधिकारी
लेखा परिक्षामंडळ(पदुम)
वरळी, मुंबई 18
2) श्री राजेंद्र काटंगे
जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक
सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर
तेलंगखेडी, नागपूर 440009 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघाच्या लेखा परीक्षणाबाबत दि. 6.4.2010 रोजी केलेल्या गुरुदत्त मेश्राम यांच्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली त्याबाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की दि. 6.4.2010 रोजी श्री गुरुदत्त जोगेन्द्रजी मेश्राम यांनी विदर्भ विभागीय मच्छिमार

सहकारी संघ नागपूरच्या लेखा परीक्षणाबाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून समाधानकारक माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही तसेच अपीलकर्ता यांनी प्रामुख्याने सुनावणीत असा मुद्या मांडला की विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघाचे लेखा परीक्षण झालेले आहे ते लेखा परीक्षण व्यवस्थित केलेले नाही. संघाच्या सन 2003 ते 2008 या कालावधीतील लेखा परीक्षण अहवालात संघा बरोबर अपीलकर्त्याने जे करार केलेले आहे त्या कराराबाबत संघाने गैरव्यवहार केलेले आहे त्या गैरव्यवहाराची नोंद विशेष लेखा परिक्षकानी लेखा परीक्षण अहवालात केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारा खाली दिलेली माहिती योग्य नसल्याचे त्यांनी नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याच्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 26.4.2010 च्या पत्राने 1 ते 8 मुद्यांची सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. तसेच दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील विशेष कार्याधिकारी लेखा परिक्षामंडळ(पदुम) वरळी, मुंबई यांचेकडे दाखल केलेले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 19.10.2010 रोजी दिला. प्रथम अपीलाच्या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.11.2010 च्या पत्राने लेखा परिक्षक कार्यालयाचे पत्ते लेखा परीक्षण करणा–या अधिका–याचे नाव आणि लेखा परीक्षण कालावधी इत्यादी बाबतची माहिती देखील उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचे दि. 29.11.2010 चे पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून आयोगा समोर अपीलकर्त्यास दि. 29.11.2010 चे पत्र उपलब्ध करुन देण्यात आले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.4.2010 च्या पत्राने व दि. 29.11.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघाच्या सन 2003 ते 2008 चे लेखा परीक्षण अहवालात संघाने जे करार केलेले आहे त्या करारामध्ये जे गैरव्यवहार झालेले आहे त्या गैरव्यवहाराची नोंद या लेखा परीक्षण अहवालात नाही. म्हणून याबाबत अपीलकर्ता यांनी संघाचे फेरलेखा परीक्षण सहकारी कायद्याप्रमाणे करण्याबाबत सक्षम अधिका–याकडे मागणी करणे संयुक्तिक होईल. हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1267-1269

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1579 नाग/2010**

श्री मनोहर विश्वनाथ बडवाईक
मु. पो. तारसा
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती मौदा
ता. मौदा जि. नागपूर
2) श्री जयकृष्ण दादाजी देवगडे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत तारसा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत तारसा ता. मौदा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बी.पी.एल.धारकांना व्याससायीक गाळे वाटप केल्याबाबतची 1 ते 3 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कृषी विकास अधिकारी पंचायत समिती मौदा यांच्या कार्यालयाकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 12.8.2010 रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत तारसा ता. मौदा यांचेकडे ग्रामपंचायतने बी.पी.एल.धारकांना व्याससायीक गाळे वाटप केलेले आहे त्याबाबतचा तपशिल त्यांनी मागितलेला होता. त्या अर्जाला

अनुसरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.9.2010 च्या पत्राने 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलााचा निर्णय त्यांना उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत तारसा हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 12.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन त्यांनी माहिती तयार केली आणि मुदतीत म्हणजे दि. 9.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास 1 ते 3 मुद्यांची सविस्तर माहिती मुद्योनिहाय पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगा समोर नमुद केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की बी.पी.एल.चे गाळे ज्यांना वाटप केलेले आहे त्यांच्या ऐवजी दुसरा व्यक्ती त्या गाळयाचा वापर करीत आहे. त्यासाठी त्यांनी आयोगा समोर एक स्वतंत्र निवेदन सादर केले. मात्र याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर ग्रामपंचायतचे गाळे वाटपाबाबतचे मुळ रेकॉर्ड सादर केले. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ज्या बी.पी.एल.धारकांना गाळे वाटप केलेले आहे त्याचा सर्व तपशिल ग्रामपंचायतच्या आवश्यक त्या रेकॉर्ड मध्ये नमुद करण्यात आलेले असून ज्यांना गाळे वाटप केलेले आहे त्यांनी गाळयाचे डिपॉझीट ग्रामपंचायत मध्ये भरलेले असून तेच लोक गाळयाचे भाडे अदा करीत असल्याचे ग्रामपंचायतच्या रेकॉर्ड वरुन दिसून येते. याबाबतचे ग्रामपंचायतचे मुळ रेकॉर्ड अपीलकर्त्यास देखील आयोगा समोर दाखविण्यात आले त्यावेळी अपीलकर्त्याने ज्यांना गाळे वाटप केलेले आहे त्यांनीच डिपॉझीट भरलेले असून तेच गाळयाचे भाडे देखील अदा करीत आहे याची खात्री केली त्यामुळे ग्रामपंचायतच्या उपलब्ध असलेल्या रेकॉर्ड वरुन ज्यांना गाळे वाटप केलेले आहे तेच गाळयाचे भाडे भरत असल्यामुळे तेच वापर करीत आहे असे रेकॉर्ड वरुन दिसून येते. याबाबत प्रत्येक गाळा वाटप धारकाशी ग्रामपंचायतने करारनामे करुन घेतलेले आहे. त्यामुळे इतर व्यक्तींना गाळे दिलेले नाही असे दिसून येते.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती शुभांगी भस्मे कृषी विकास अधिकारी पंचायत समिती मौदा हे हजर होत्या. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दि. 20.9.2010 रोजी प्राप्त झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.10.2020, दि. 12.11.2010 व दि. 29.11.2010 रोजी ठेवण्यात आली होती. तथापी तीन्ही तारखांना अपीलकर्ता हे गैरहजर होते. यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना सदरचे पत्र पोस्टाने उशिरा मिळाले. मात्र याबाबत रेकॉर्ड पाहिले असता असे दिसून येते की अपीलकर्त्यास सुनावणीच्या तारखांचे पत्र पोस्टाने

पाठविलेले दिसून येते. त्यामुळे प्रथम अपीलाच्या सुनावणीचे पत्र पोस्टाने पाठविल्या बाबत आयोगाची खात्री झालेली दिसून येते. मात्र सुनावणीस उपस्थित न झाल्यामुळे अपीलाचा निर्णय देता आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर अपीलकर्ता जरी सुनावणीस उपस्थित झाले नाही तरी अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित आहे म्हणून भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा बाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांनी देण्यात येत आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.9.2010 च्या पत्राने माहिती अर्जाला अनुसरुन तीन्ही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1271-1273

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1581 नाग/2010

श्री हरीदास मंगरु वाकुलकर
मु. कोर्धा
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहआयुक्त
महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
3, चर्च रोड, पुणे–1

2) श्री डी. व्ही. देसावळे
जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन)
महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
3, चर्च रोड, पुणे–1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.1.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महिला व बाल विकास आयुक्तालया मार्फत दि.7.2.1010 ला झालेल्या वरीष्ठ लिपीक परीक्षेच्या निकालाबाबत खालील दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. 1. दि.7.2.1010 ला झालेल्या वरीष्ठ लिपीक पदाच्या परीक्षेतून मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्तासह यादी तसेच 2. प्रवर्गानुसार म्हणजे एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., ओपन यानुसार निवड झालेल्या उमेदवारांची यादी आणि अपीलकर्त्याच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने  जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 5.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सहआयुक्त यांचेकडे दाखल केलेले दिसते. प्रथम अपील फेटाळल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 26.5.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे दि.7.2.1010 ला झालेल्या वरीष्ठ लिपीक पदाच्या भरती परीक्षेची वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 5.6.2010 रोजी त्यांना उत्तर पाठविले. त्यामध्ये असे नमुद केले आहे की भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळे माहिती देता येत नाही. या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सहआयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर होते. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.8.2010 रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये देखील रीक्त पदे भरण्याबाबतची अंतीम कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे माहिती देता येत नाही असा निर्णय देवून त्यांचे प्रथम अपील निकाली काढले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीच्या अधिकारा खालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 2.6.2010 रोजी प्राप्त झला. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास 5.6.2010 च्या पत्राने उत्तर पाठविण्यात आले. त्या उत्तरात असे नमुद केले की भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही त्यामुळे माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील रीक्त पदे भरण्याकरीता शासनाकडील दि.31.10.2009 चे शासन निर्णयानुसार सदर भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी कुणाल आय टी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड पूणे यांना मान्यता देण्यात आली आहे. वरीष्ठ लिपीक व इतर पदाच्या लेखी परीक्षा सदर संस्थेकडून घेण्यात आल्या आहेत. मात्र उमेदवाराची अंतीम निवड अद्याप झालेली नाही त्याचे कारण नमुद करतांना त्यांनी आयोगा समोर वित्त विभाग शासन निर्णय दि. 5 जुन 2010 ची प्रत दाखल करुन असे नमुद केले की शासनाने या शासन निर्णयान्वये गट ‘क’ व गट ‘ड’ मधील पदे भरण्यास 1 वर्षाच्या कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आलेले आहे. त्यामुळे आयुक्तालया मार्फत भरती प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. म्हणून नेमके कोणत्या उमेदवाराची निवड झालेली आहे याची सद्यस्थितीत माहिती

उपलब्ध नाही. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास 5.6.2010 च्या पत्राने भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविले आहे.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहआयुक्त यांच्या वतीने उपायुक्त हे प्राधिकार पत्र घेवून उपस्थित होते. त्यांनी देखील आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 30.6.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्याची सुनावणी दि. 16.8.2010 रोजी घेण्यात आली त्या सुनावणीत अपीलकर्त्याने दिलेले निवेदन विचारात घेण्यात आले आणि निर्णय दि. 16.8.2010 रोजी देण्यात आला. सदरच्या निर्णयात देखील रीक्त पदे भरण्याबाबतची अंतीम कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती देता येत नाही असा निर्णय देवून त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील रीक्त पदे भरण्याकरीता शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी कुणाल आय टी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड पूणे यांना मान्यता दिलेली होती. त्यांनी वरीष्ठ लिपीक व इतर पदाच्या लेखी परीक्षा घेतल्या. मात्र दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील दि. 5 जुन 2010 च्या शासन निर्णया प्रमाणे गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचा–याच्या पद भरतीस 1 वर्षाच्या कालावधीसाठी निर्बध घालण्यात आल्याने भरती प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. त्यामुळे वरीष्ठ लिपीक पदाच्या भरतीत नेमकया कोणत्या उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे हे अद्यापपर्यंत निश्चित झालेले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास वरीष्ठ लिपीक पदाच्या निवडी संदर्भात मागितलेली माहिती देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले योग्य आहे. तथापी सदरची भरतीची प्रक्रिया वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. 5 जुन 2010 शासन निर्णयाच्या दिनांकापासून 1 वर्षाच्या कालावधीसाठी निर्बध घालण्यात आलेले आहे असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविण संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वरीष्ठ लिपीक पद भरतीची प्रक्रिया शासन निर्णय वित्त विभाग यांचेकडील

दि. 5 जुन 2010 प्रमाणे या पद भरतीस शासन निर्णयाच्या दिनांकापासून 1 वर्षाच्या कालावधीसाठी निर्बध घालण्यात आलेले आले असल्यामुळे सद्या पद भरतीची कार्यवाही पूर्ण करता आली नाही असे स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

Ageyord6.1275-1278

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1584 नाग/2010**

श्री दिगंबर नत्थु रामटेके
रा. कुंभारे नगर, पिंपरारोड,
श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर,तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक
होलाराम कॉलनी, साधु वासवानी रोड, नाशिक 422002
2) श्री ए. बी. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक
होलाराम कॉलनी, साधु वासवानी रोड, नाशिक 42200 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.1.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अधिक्षक अभियंत्याच्या पदोन्नतीबाबत 1 ते 6 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी काही मुद्यांची माहिती त्यांना न मिळाल्यामुळे त्यांनी अधिक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की माहितीच्या अधिकारा खाली दि. 7.6.2010 रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अधिक्षक पदांच्या पदोन्नतीबाबत 1 ते 6 मुद्यांची माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे आवश्यक ती फी त्यांनी भरणा केली त्यानुसार दि. 11.8.2010 च्या पत्रान्वये त्यांना 1 ते 6 मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्र. 1 मध्ये त्यांनी अधिक्षक पदांच्या निवड सूचीची प्रत मागितलेली होती. तथापी त्यांना निवड सूचीची प्रत न देता जेष्ठता सूचीची प्रत दिली. त्याचप्रमाणे मुद्या क्र. 2 आणि 6 ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही तसेच माहितीची फी ची रक्कत मनी ऑर्डरने रु.50/— पाठविलेली होती. मात्र प्रत्यक्ष खर्च रु.35/— झालेला आहे. म्हणून रु.15/— हे परत मिळावे असे त्यांनी आयोगा समोर सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक अभियंता हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.6.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज पोस्टाद्वारे त्यांचेकडे दि. 18.6.2010 ला प्राप्त झाला. माहितीच्या अर्जातील माहिती काढली आणि त्यानुसार माहितीची फी भरण्यासाठी अपीलकर्त्यास दि. 25.6.2010 रोजी पत्र दिले. त्या पत्राला अनुसरुन अपीलकर्त्याने दि. 6.8.2010 रोजी मनी ऑर्डरने रु.88/– ची फी चा भरणा केला आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 11.8.2010 रोजी 1 ते 6 मुद्यांची माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगा समोर सुनावणीत नमुद केले. मात्र मुद्या क्र. 1 मध्ये अपीलकर्त्याने अधिक्षक पदांच्या निवड सूचीची प्रत मागितलेली होती. त्यावेळी निवड सूची ऐवजी जेष्ठता सूचीची प्रत उपलब्ध असल्यामुळे ती पाठविण्यात आली. तथापी ही बाब अपीलकर्त्याने निदर्शनास आणून दिल्या नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात निवड सूचीचा शोध घेतला परंतू त्यावेळेला निवड सूचीचे काम करणारे संबंधित कर्मचारी यांना बोलावून घेतले आणि त्यानंतर निवड सूचीची प्रत प्राप्त झाली. सदरची निवड सूचीची प्रत अपीलकर्त्यास आयोगा समोर आज उपलब्ध करुन दिली. ती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. तसेच आज आयोगा समोर निवड सूचीच्या संदर्भात जी माहिती दिली त्यामध्ये मुद्या क्र. 2 याची माहिती देखील पुरविली ती माहिती देखील अपीलकर्त्याने स्वीकृत केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्याने आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की मुद्या क्र. 6 च्या संदर्भात अनुसुचीत जातीचा कर्मचारी जेष्ठ असूनही बिंदू नामावली नुसार अनुसुचीत जमातीचा अनुशेष आहे. म्हणून अनुसुचीत जातीच्या कर्मचा–यास पदोन्नती देण्यात येवू नये अथवा पदोन्नतीसाठी डावलण्यात यावे याबाबत शासनाच्या आदेशाची प्रत त्यांना पाहिजे आहे. मात्र अशा प्रकारचा आदेश किंवा शासनाचे परीपत्रक नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून मुद्या क्र. 6 बाबत जन माहिती अधिकारी यांनी शासनाच्या आदेशाची किंवा परीपत्रकाची प्रत उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 88/– भरले आहे त्यामध्ये रु.50/– हा पोस्टेज चार्जेस आहे. मात्र पोस्टाचा रु.35/– खर्च झालेला आहे म्हणून रु.15/– परत करण्याची मागणी त्यांनी केलेली आहे. सदरचे रु.15/– हे अपीलकर्त्यास परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांच्या वतीने श्री एस. पी. चौधरी कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयाकडे दि. 26.8.2010 रोजी प्राप्त झाले. प्रस्तूत अपीलाची सुनावणी दि. 22.9.2010 व दि. 30.9.2010 रोजी ठेवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित झाले नाहीत. अपीलकर्त्यास माहितीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन अपील रद्यबातल केलेले आहे असे त्यांनी सुनावणीत नमूद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकत्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.8.2010 रोजी विहित मुदतीत 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच आयोगासमोर मुद्या क्र 1 आणि 2 या मुद्यांची अपेक्षित माहिती देखील अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क्र. 6 बाबत अनुसुचीत जातीचा कर्मचारी जेष्ठ असूनही बिंदू नामावली नुसार अनुसुचीत जमातीचा अनुशेष आहे. म्हणून अनुसुचीत जातीच्या कर्मचा–यास पदोन्नती देण्यात येवू नये अथवा पदोन्नतीसाठी डावलण्यात यावे याबाबत शासनाचे आदेश किंवा परीपत्रक उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे अपीलकर्त्यास पोस्टेजचा खर्च रु.15/– वर नमूद केल्याप्रमाणे परत करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोस्टेजचा खर्च रु.15/– परत करावे. तसेच अनुसुचीत जातीचा कर्मचारी जेष्ठ असूनही बिंदू नामावली नुसार अनुसुचीत जमातीचा अनुशेष आहे. म्हणून अनुसुचीत जातीच्या कर्मचा–यास पदोन्नती देण्यात येवू नये अथवा पदोन्नतीसाठी डावलण्यात यावे याबाबत शासनाचे आदेश किंवा परीपत्रक उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1280-1282

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1587 नाग/2010**

श्री मनोज अंबादास ओझरकर
द्वारा प्रविण म. ओझरकर
149 मारोती नगर, दत्तवाडी, अमरावती रोड
नागपूर ता. जि. 23 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक
नागपूर विभाग नागपूर
66, शिवनेरी, दगडीपार्क जवळ,
रामदास पेठ, नागपूर 440010
2) श्री शरदचंद्र ज. पाली लेखाधिकारी
जन माहिती अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
66, शिवनेरी, दगडीपार्क जवळ,
रामदास पेठ, नागपूर 440010 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.1.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 24.4.1987 रोजी सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या प्रकरणाच्या कार्यवाहीच्या संदर्भात कागदपत्र मागितलेली दिसून येतात. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रभारी अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर आवश्यक ती माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की ते पूर्वी कृषी विभागाच्या अंतर्गत मृदसंधारण विभागात कृषी सहाय्यक या पदावर कार्यरत होते. तथापी 24 एप्रिल 1987 च्या आदेशान्वये त्यांना कृषी विभागाने सक्तीने संवानिवृत्त केले म्हणून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या प्रकरणी कागदपत्राच्या प्रती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या होत्या. जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दि. 22.11.2010 रोजी काही माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती अपूर्ण असून त्यांना पाहिजे असलेली माहिती अद्यापही त्यांना मिळालेली नाही म्हणून

त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही 23 वर्षाची जुनी आहे. तथापी सदरच्या माहितीच्या संबंधातील नस्ती उपलब्ध झाल्यास अर्जदारास पोस्टाने माहिती पुरविण्यात येईल असे नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 23 वर्षापूर्वीची आहे. 23 वर्षापूर्वी अपीलकर्ता हे कृषी विभागाच्या अंतर्गत मृदसंधारण विभागात कृषी सहाय्यक या पदावर कार्यरत होते. त्यावेळेला त्यांना सक्तीने संवानिवृत्त केलेले होते. सदरचा सक्तीने संवानिवृत्त करण्याचा आदेश दि. 24.4.1987 चा आहे. अपीलकर्त्याने या प्रस्तावा संबंधातील कागदपत्राची माहिती मागितल्यामुळे सदरची माहिती ही 23 वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे त्या माहितीचा शोध घेण्यात आला. कारण पूर्वी कृषी विभागात मृदसंधारण तसेच विस्तार आणि फलोत्पादन हे तीन विभाग वेगवेगळे होते त्यानंतर एक खिडकी योजनेखाली शासनाने या तीन्ही विभागाचे एकत्रीकरण सन 1998 मध्ये केले आणि त्यानुसार तीन्ही विभागाचे रेकॉर्ड हे विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयामध्ये एकत्रित करण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने अशा प्रकारची 23 वर्षापूर्वीची जुन्या माहितीच्या संदर्भात राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे देखील अपील क्रमांक 376/2010 दाखल केले होते. त्या अपीलाचा निर्णय दि. 16.12.2010 रोजी देण्यात आला. आणि राज्य माहिती आयुक्त अमरावती यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती 23 वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. असेही जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्याने दरम्यानच्या काळात प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेण्यात आला. त्यामध्ये अपीलकर्त्याच्या संबंधातील पाच धारीका सापडल्या. त्या धारीकेतील उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 रोजी टिपण्या आणि आदेशाच्या प्रती त्यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या वतीने श्री ए. एन. शेंडे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता देखील हजर होते. आणि त्यांच्या समक्ष असा निर्णय घेण्यात आला की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 23 वर्षापूर्वीची जुनी आहे. तथापी ती माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास पोस्टाने कळविण्यात येईल. आणि त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 22. 11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली माहिती दिलेली आहे. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना पाहिजे असलेली माहिती अद्यापही मिळालेली नाही म्हणून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की अपीलकत्याच्या संदर्भात त्यांना पाच धारीका प्राप्त झालेल्या आहेत त्याचे अपीलकर्त्याने निरीक्षण करुन घेवून त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरच्या धारीकेचे निरीक्षण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी आणि वेळेत करण्याबाबत अपीलकर्ता यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्यास सद्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या पाचही धारीकेचे निरीक्षण करु द्यावे आणि निरीक्षणा नंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी आणि वेळेत पूर्व सुचना देवून हजर राहावे आणि त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलबध असलेल्या नस्तीचे निरीक्षण करुन घेवून त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1284-1286

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 334/2010**

श्री गोपाळा मारोतराव पोटदुखे
रा. चिंचगुडी
ता. अहेरी जि. गडचिरोली ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जी. एम. बोरकुटे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत अहेरी
ता. अहेरी जि. गडचिरोली ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.1.2011 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 14.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दि. 14.9.2010 रोजी आयोगाकडील अपील क्र. 436/2010 मधील दि. 25. 5.2010 रोजी दिलेल्या निर्णयानुसार प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी जिल्हा गडचिरोली यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत अहेरी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांना पुर्वीच्या सचिवाकडून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे तक्रारदारास माहिती देता आली नाही. म्हणून राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. 436/2010 मधील दि. 25.5.2010 रोजी दिलेल्या निर्णयानुसार संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी जिल्हा गडचिरोली यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही किंवा तत्कालीन सचिवा विरुध्द काय कार्यवाही केली त्याची देखील जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची माहिती नाही असे त्यांनी सुनावणीत असे सांगितले.

4. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे नमुद केले की विद्यमान सचिवाना तत्कालीन सचिवाकडून पदभार मिळण्यासाठी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाच्या अपील क्र. 436/2010 मध्ये आदेश होते. मात्र संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही तसेच संबंधित सचिवा विरुध्द कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

5. तक्रारदार तसेच जन माहिती अधिकारीयांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयागाने अपील क्र. 436/2010 मध्ये दि. 25.5.2010 रोजी निर्णय देवून संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांनी सदरच्या प्रकरणातील प्रथम अपीलामध्ये सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल असे पाहावे अन्यथा जबाबदारी निश्चित करुन

संबंधित सचिवा विरुध्द योग्य ती कार्यवाही करावी असे आदेश दिलेले होते. मात्र संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांनी प्रथम अपीलामध्ये सुनावणी घेवून त्याबाबत कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांनी आयोगाच्या अपील क्र. 436/2010 मधील दि. 25.5.2010 च्या निर्णया नुसार 15 दिवसात प्रथम अपीलाची सुनावणी घेवून कार्यवाही करणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी जिल्हा गडचिरोली यांनी आयोगाकडील अपील क्र. 436/2010 मधील दि. 25.5.2010 च्या निर्णया नुसार प्रथम अपीलाची सुनावणी घेवून आदेशात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल असे पाहावे अन्यथा जबाबदारी निश्चित करुन संबंधित सचिवा विरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.
2) संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी जिल्हा गडचिरोली यांनी वरील प्रमाणे कार्यवाही न केल्यास ते शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
3) सदरच्या कार्यवाहीसाठी या निर्णयाची एक प्रत संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती अहेरी जिल्हा गडचिरोली यांना पाठविण्यात यावी.
4) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1288-1289

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 253/2010**

श्री गोपाळा मारोतराव पोटदुखे
रा. चिंचगुडी
ता. अहेरी जि. गडचिरोली ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एस. के. सांबरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भुमी अभिलेख कार्यालय अहेरी
ता. अहेरी जि. गडचिरोली
2) श्री बी. के. पोटे
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भुमी अभिलेख कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.1.2011 रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दि. 21.8.2010 रोजी आयोगाकडील अपील क्र. 279/2010 मधील दि. 27.4.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही अशी तक्रार दाखल केलेली आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अहेरी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की आयोगाचे अपील क्र. 279/2010 मधील दि. 27.4.2010 चा निर्णय त्यांच्या कार्यालयाकडे दि. 27.9.2010 रोजी गडचिरोली कार्यालयाकडून मिळाला कारण सदरचा आदेश प्रथमतः चुकून गडचिरोली कार्यालयाकडे गेलेला होता. त्यानंतर गडचिरोली कार्यालयाकडून त्यांच्या अहेरी कार्यालयाकडे सदरचा आदेश दि. 27.9.2010 रोजी प्राप्त झाला. मा. आयोगाच्या आदेशास अनुसरुन तक्रारदार श्री गोपाळा मारोतराव पोटदुखे रा. चिंचगुडी ता. अहेरी जि. गडचिरोली यांना दि. 29.9.2010 रोजी पान क्र. 1 ते 13 ची माहिती पंजीबध्द

डाकेने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती तक्रारदारास प्राप्त झाल्याचे तक्रारदाराने सुनावणीत मान्य केले. मात्र तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बयाणावर केलेली कार्यवाही बरोबर नसून अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडे पाठविलेला अहवाल योग्य नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी बयाणावर केलेली कार्यवाही योग्य आहे अगर कसे ही बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. म्हणून त्याबाबत तक्रारदाराने सक्षम अधिका–याकडे स्वतंत्रपणे दाद मागणे योग्य होईल. तथापी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बयाणावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1291-1292

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 332/2010**

ॲड. धनश्री के. चिलबुले
345, श्रध्दा हाऊस, पहिला माळा,
किंग्जवे, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता(विद्युत विभाग)
नागपूर महानगर पालिका, नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.1.2011 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 30.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्ररीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी आयोगाकडील अपील क्र. 1185/2010 च्या दि. 20.1.2010 रोजीच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांनी महानगर पालिका, नागपूरकडे मागितलेल्या अहवालाची संपूर्ण प्रत परीशिष्टासह अद्यापही उपलब्ध झालेली नाही. आयोगाने या आदेशात 10 दिवसाच्या आत आयुक्त महानगर पालिका, नागपूर यांनी संबंधित अधिका–यांना आदेश देवून तक्रारदार यांना अहवालाची संपूर्ण प्रत परीशिष्टासह विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिलेले होते. मात्र अद्यापही त्यांना परीशिष्टासह अहवाल मिळाला नाही अशी त्यांनी आयोगाकडे तक्रार केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता महानगर पालिका, नागपूर हे उपस्थित होते. तसेच त्यांचे समवेत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एस. बी. जयस्वाल कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की महानगर पालिकेच्या स्थायी समितीने नगर सेवकाची एक उपसमिती नेमली होती. या समितीने व्हायब्रंट इन्फोटेक लिमि. या कंपनीची कार्यपध्दती तसेच त्या कंपनीच्या कामकाजाची पाहणी करणे तसेच त्या कंपनीच्या निविदा आणि करारनाम्याची पाहणी करुन त्यावर अहवाल तयार करण्याचे काम दिलेले होते. त्याला अनुसरुन त्या समितीने महानगर पालिकेकडे दिलेल्या अहवालाची झेरॉक्स प्रत तीन पानाची आहे. मात्र त्या सोबत कोणत्याही प्रकारचे परीशिष्ट जोडलेले नाही. तक्रारदार हया स्वतः महानगर

पालिकेत आल्या असता त्यांना ही संपूर्ण धारीका दाखविली. त्या धारीकेमध्ये केवळ तीन पानाचा अहवाल आहे मात्र त्या सोबत परीशिष्ट नाही याची खात्री तक्रारदार यांची करुन देण्यात आली आणि तक्रारदार यांना दि. 12.10.2010 च्या पत्राने तसे कळविलेले आहे. तथापी दि. 12.10.2010 चे पत्र पुन्हा तक्रारदारास आयोगासमोर देखील देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असही निदर्शनास आणून दिले की माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्जदाराला हवी असलेल्या अहवालाची संपूर्ण प्रत परीशिष्टासह त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही. त्याकरीता मा. आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी ज्या विभागाकडे ही माहिती असणे अपेक्षित आहे त्या सर्व विभागाच्या प्रमुखाकडून माहिती उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत लेखी प्रमाणपत्र घेण्याचे आदेश दिले होते. त्याला अनुसरुन संबंधित विभागात माहिती नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागाकडून देण्यात आले आहे. म्हणून मा. आयुक्त महानगर पालिका नागपूर यांच्या आदेशान्वये सदर प्रकरणाची विभागीय चौकशी सुरु आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असेही जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

4. एकंदरीत असे दिसून येते की तक्रारदार यांना अहवालाची प्रत उपलब्ध झालेली आहे मात्र त्या सोबतचे परीशिष्ट महानगर पालिकेकडे उपलब्ध नसल्यामुळे देता आले नाही म्हणून तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1294-1295

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 343/2010**

श्री ले. कर्नल श्रीकांत वाय. काणे
112 बी, शिवाजी नगर
नगपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा झोनल अधिकारी (स्वच्छता)
धरमपेठ क्षेत्रीय कार्यालय – 2
कार्यालय, नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 8.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल करुन त्यात असे नमूद केले की आयागाकडील अपील क्रमांक 252/2010 मधील दि. 1.11.2010 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी नागपूर महानगर पालिकेच्या नगर सेवकाच्या कर्तव्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. आजच्या तक्रारीच्या सुनावणीस स्वतः तक्रारदार हजर आहेत. त्यांनी सुनावणीत असे नमूद केले की नागपूर महानगर पालिकेत नगर सेवक निवडून आलेले आहेत त्या नगर सेवकांचे कर्तव्य काय आहेत याची माहिती त्यांना अद्यापही उपलब्ध झालेली नाही. मात्र त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 4.11. 2010 रोजी जी माहिती प्राप्त झालेली आहे त्या माहिती मध्ये नगर सेवकांसाठी Charter of responsibility नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमात तरतुद नाही असे कळविलेले आहे. तथापी नगरपालीकंच्या अधिनियमात नगर सेवकांसाठी कर्तव्य असणे

आवश्यक आहे. त्याप्रमाणे महानगर पालिकेने त्यांच्या अधिनियमात तरतुद करावी असे आग्रही प्रतिपादन तक्रारदार यांनी सुनावणीत केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रभारी विभागीय अधिकारी (स्वच्छता) झोन क्र. 2 महानगर पालिका नागपूर श्री डी. पी. टेंभेकर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगासमोर असे नमूद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 252/2010 मधील दि. 1.11.2010 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे मा. निगम सचिव नागपूर महानगर पालिका यांचेकडे दि. 2.11.2010 च्या पत्राने नगर सेवकांच्या कर्तव्याची व जबाबदारीची माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित असल्यामुळे मागितलेली होती. त्याला अनुसरुन सचिव महानगर पालिका नागपूर यांनी त्यांचेकडील दि. 4.11.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांना असे कळविले की नगर सेवकांसाठी Charter of responsibility नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमा अंतर्गत नाही. सचिव महानगर पालिका नागपूर यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी दि. 4. 11.2010 च्या पत्राने तक्रारदार यांना दि. 4.11.2010 चे सचिव महानगर पालिका नागपूर यांनी पाठविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. त्यावरुन नगर सेवकांसाठी Charter of responsibility नागपूर महानगर पालिका अधिनियमात नाही असे दिसून येते असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

4. तक्रारदार व गैरतक्रारदार यांचे म्हणणे एकून घेतल्या नंतर असे दिसून येते की नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमात नगर सेवकांसाठी Charter of responsibility ची तरतुद नाही असे सचिव महानगर पालिका नागपूर यांनी कळविल्याचे दिसून येते. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. 4.11.2010 च्या पत्राने सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

5. तथापी तक्रारदार यांचे याबाबत मुख्य म्हणणे असे आहे की नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमात नगर सेवकांसाठी Charter of responsibility ची तरतुद असणे आवश्यक आहे म्हणून व्यापक जनहितासाठी नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमात नगर सेवकांसाठी Charter of responsibility ची तरतुद करणे योग्य व संयुक्तिक होईल हा तक्रारदाराचा मुद्या योग्य दिसून येतो. म्हणून आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी व्यापक जनहितासाठी अधिनियमात तशी तरतुद करुन घेण्याची योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. तथापी तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास दि. 4.11.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त महानगर पालिका नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे योग्य त्या कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1289-1291

जा.क्र.————————— दि...................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 344/2010

श्री ले. कर्नल श्रीकांत वाय. काणे
112 बी, शिवाजी नगर
नगपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री सु. द. नाईक, कर्नल
जन माहिती अधिकारी
सैनिक कल्याण विभाग,
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर,
सोलापूर रस्ता, घोरपडी,
पुणे 411001 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 30.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे असे नमूद केले की त्यांनी दिनांक 30.9.2010 रोजी आयोगाकढे अशी तक्रार दाखल केलेली आहे की त्यांनी जन माहिती अधिकारी सैनिक कल्याण विभाग घोरपडी, पुणे यांचेकडे दि. 7.9.2010 रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन अशी माहिती मागितलेली होती की जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती झाल्या नंतर सदर अधिका–याची सैन्य सेवा बाबतची माहिती त्यांच्या विभागाडून DGR/KSB ला पाठविले जाते काय ही माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जाला अनुसरुन शासकीय माहिती अधिकारी सैनिक कल्याण विभाग पुणे यांनी त्यांना दि. 7 आक्टोबर 2010 च्या पत्राने असे कळविले की जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती झाल्या नंतर सदर अधिका–याची सैन्य सेवा बाबतची माहिती त्यांच्या विभागाडून DGR/KSB ला पाठविली जात नाही म्हणून सदरची माहिती जन माहिती अधिकारी

याच्या विभागात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले असे तक्रारदार यांनी सुनावणीत नमूद केले. तथापी तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर ज्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत त्याबाबतची माहिती देणे आवश्यक होते. तथापी ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही असे तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे, कर्नल सु. द. नाईक हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमूद केले की तक्रारदार यांचा माहितीचा दि. 7.9.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात तक्रारदार यांनी अशी माहिती मागितलेली होती की जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती झाल्या नंतर सदर अधिका–याची सैन्य सेवा बाबतची माहिती त्यांच्या विभागाडून DGR/KSB ला पाठविले जाते काय हयाच मुद्याची माहिती तक्रारदार यांनी मागितली होती. म्हणून सदरची माहिती तक्रारदार यांना दि. 7 आक्टोबर 2010 च्या पत्राने उपलब्ध करुन असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की या विभागातील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी (गट अ) संवर्गातील सर्व पदावर सेवानिवृत्त पात्र सेनाधिका–यामधून महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडून निवड केली जाते. निवड केलेल्या अधिका–याची सामान्य प्रशासन विभागाकडून या विभागा अंतर्गत रीक्त असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती दिली जाते. मात्र जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती झाल्या नंतर सदर अधिका–याची सैन्य सेवा बाबतची माहिती त्यांच्या विभागाडून DGR/KSB ला पाठविली जात नाही असे स्पष्टपणे कळविले आहे. मात्र तक्रारदार यांनी माहितीच्या अर्जात जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिका–याची यादी मागितलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले.

4. तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्या नंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 7 आक्टोबर 2010 च्या पत्रान माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि सदरची माहिती तक्रारदार यांना प्राप्त झालेली आहे. मात्र तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिका–याची यादी त्यांना मिळणे आवश्यक आहे. सदरची यादी तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे योग्य व संयुक्तीक दिसून येते आणि जन माहिती अधिकारी यांनी देखील सदरची यादी तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यास संमती दिली म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिका–याची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1293-1295

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 355/2010

श्री रत्नाकर हरिभाऊ लोहकरे
रा. प्लॉट नं. 88, रामकृष्ण नगर,
दत्तवाडी, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री प्रेमानंद कुंभारे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती हिंगणा
जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 11.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार श्री रत्नाकर हरिभाऊ लोहकरे हे हजर होते. त्यांनी तक्रारीत असे नमुद केले की त्यांच्या वडीलोपार्जीत घराचे बोगस वाटणीपत्र रद्य करुन ग्रामपंचायत चिचोरी (पठार) येथे असलेले तीन्ही घरे पूर्वीस्थितीत करण्याकरीता त्यांनी सर्वप्रथम ग्रामपंचायत, पंचायत समिती हिंगणा आणि जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे अर्ज दिले होते. त्याला अनुसरुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांनी खंड विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दि. 19.1. 2010 चे पत्र पाठवून त्यांच्या अर्जाची चौकशी करण्याचे आदेश देवून ग्रामपंचायत चिचोरी (पठार) यांना निर्देश द्यावेत असे आदेश दिलेले होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील दि. 19.1.2010 च्या पत्रावर काय कार्यवाही केली त्याची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांचेकडे मागितली होती. त्याबाबत सदरच्या पत्रावर केलेल्या चौकशीचा दि. 29.3.2010 चा चौकशी अहवाल त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिला. मात्र सदरच्या चौकशी अहवालातील चौकशी ही नियमानुसार

केलेली नसून ती एकतर्फी आहे असा आक्षेप त्यांनी नोंदविला. सुनावणीत तक्रारदार यांनी असेही नमुद केले की त्यांची वडील श्री हरिभाऊ लोहकरे हे मनोरुग्ण अवस्थेत असतांना त्यांचे काका श्री शेषराव व श्री पंजाबराव यांनी बोगस वाटणीपत्र तयार केले आणि बोगस वाटणीपत्राच्या आधारे घराचे हिस्से केले. सदरचे वाटणीपत्र बोगस असल्यामुळे महसूल विभागाने ते वाटणीपत्र रद्यबातल ठरविले. त्यानंतरही त्यांच्या वडीलोपार्जीत घराचे एकत्रीकरण झालेले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती हिंगणा श्री प्रेमानंद कुंभारे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 28.8.2010 ला प्राप्त झाला. त्या अर्जात तक्रारदार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील दि. 19.1.2010 च्या पत्रानुसा केलेल्या चौकशीचा अहवाल त्यांनी मागितला होता. त्या चौकशीचा दि. 29.3.2010 चा चौकशी अहवाल पंचायत समितीच्या संबंधित विभागा कडून प्राप्त करुन घेवून तक्रारदार यांना त्याच दिवशी उपलब्ध करुन दिलेला आहे. तथापी सदरचा चौकशी अहवाल हा योग्य आहे अगर कसे हे ठरविण्याची बाब जन माहिती अधिकारी यांच्या कक्षेत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

4. तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील दि. 19.1.2010 च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा दि. 29.3.2010 चा चौकशी अहवाल तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेला आहे. तथापी दि. 29.3.2010 चा चौकशी अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे सादर केलेला दिसून येतो. सदरचा चौकशी अहवाल योग्य आहे अगर कसे हे तपासण्यासाची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून सदरच्या चौकशी अहवालावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांनी योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. म्हणून सदरच्या चौकशी अहवाला बाबत तक्रारदार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी सदरचा चौकशी अहवाल उपलब्ध करुन दिलेला असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1302-1304

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 356/2010**

श्री शामदेव काशिरामजी तितरमारे
प्लॉट नं. 27, चंदननगर
नागपूर 440009 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

श्री बालपांडे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
भंडारा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 22.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हजर आहेत. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की आयोगाकडील अपील क्र. 941/2010 मधील दि. 2.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र तक्रारदार यांनी असेही नमूद केले की त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून घेण्यात येत आहे म्हणून त्या नस्तीचा शोध घेण्यासाठी व त्यांना माहिती उपलब्ध होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना मुदतवाढ देण्यास त्यांची संमती आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार भंडारा हे उपस्थित होते. त्यांनी त्यांचेकडील दि. 30.1.2011 च्या लेखी पत्राद्वारे त्यांचा सविस्तर खुलासा सादर केलेला आहे. तसेच त्यांनी आजच्या सुनावणीत असेही नमूद केले की मा. आयोगाचे दि. 2.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांच्या सदर प्रकरणाचा शोध घेण्याकरीता त्यांच्या कार्यालया मार्फत सर्व प्रस्तूतकार व पथक प्रमुख श्री हिंगे नायब तहसिलदार यांचे पथक नेमले होते. सदरचे पथक सदरच्या नस्तीचा शोध घेत आहे. तहसिल कार्यालयातील संबंधित शाखांमध्ये या नस्तीचा शोध घेण्यात आला. मात्र अद्यापही निवडणूक शाखा तसेच संजय गांधी सहाय्य योजना शाखा आणि नैसर्गिक आपत्ती शाखा या तीन शाखां मध्ये नस्ती शोधण्याचे काम शिल्लक आहे. तक्रारदार

यांचे सदर प्रकरण सन 1988–1989 चे म्हणजे सुमारे 22 वर्षाचे जुने असल्यामुळे उक्त प्रकरणाचा शोध घेण्यास अडचण होत आहे. मात्र तक्रारदार यांनी मागितलेल्या माहिती अभिलेखाचे शोध घेण्याचे काम प्रमाणिकपणे त्यांचे कार्यालयाकडून करण्यात येत असून अभिलेखाचा शोध लागताच तक्रारदारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. तक्रारदार यांनी देखील जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून या प्रकरणाचा शोध घेण्याची कार्यवाही प्रमाणिकपणे होत आहे याबाबत सुनावणीत समाधान व्यक्त केले म्हणून जन माहिती अधिकारी व तक्रारदार यांच्या संमतीने सदर प्रकरणाचा शोध घेण्याचा कालावधी पुन्हा एक महिन्याने वाढविण्यात आला म्हणून एक महिन्यात पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये सदरच्या नस्तीचा शोध घेवून तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**

**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1306-1307

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 352/2010

श्री अजय आर. मिश्रा
61, रतननगर, मानकापूर,
नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री ए. आर. पाजनकर
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी
तेलंगखेडी रोड, सिव्हिल लाईन्स,
नागपूर –1 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.1.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 3.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 12.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.1.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हजर होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे नमुद केले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन 1 ते 5 मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.11.2010 च्या पत्राप्रमाणे माहिती देण्यास नकार दिलेला असून सदरच्या पत्रात माहिती नाकारण्याचे कारणही नमूद केलेले नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नाव देखील त्यांना कळविलेले नाही म्हणून माहितीच्या अधिकारा अन्वये त्यांना माहिती न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी कळविणे आवश्यक होते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नाव देखील त्यांना कळविणे आवश्यक होते असे तक्रारदार यांनी सुनावणीत नमूद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी श्री ए. आर. पाजनकर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांचा माहिती मागण्याचा दि. 22.11.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी सदरचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (1) प्रमाणे विहित नमुन्यात नव्हता तसेच सदरच्या अर्जात कालावधी दिला नव्हता आणि माहिती ऐवजी मार्गदर्शन, सल्ला व जबाबदारी निश्चित करणे इत्यादींचा समावेश होता. सदरच्या बाबी माहिती अधिकारात येत नाही म्हणून अर्जदारास माहितीची आवश्यकता असल्यास रीतसर अर्ज करुन त्यामध्ये कालावधी नमूद करुन अर्ज सादर केल्यास माहिती पुरविणे शक्य होईल असे तक्रारदार यांना दि. 24.11.2010 च्या पत्रान्वये कळविलेले होते. मात्र अद्यापही तक्रारदार यांनी विहित नमुन्यात अर्ज सादर केला नाही तसेच कालावधी दिलेला नाही म्हणून तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही तथापी तक्रारदार यांनी विहित नमुन्यात अर्ज केल्यास व त्यात कालावधी नमूद केल्यास त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती नियमाप्रमाणे तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांनी सुनावणीत नमूद केले.

4. तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 22.11.2010 रोजी माहिती मागण्यासाठी केलेला अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (1) अंतर्गत विहित नमुन्यात नाही तसेच त्या अर्जात माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (1) च्या तरतुदी नुसार तक्रारदार यांनी विहित नमुन्यात माहिती मागण्याचा अर्ज करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित नमुन्यात तक्रारदार यांनी अर्ज केल्यास व त्यात माहितीचा कालावधी नमूद केल्यास त्यांचेकडून त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात येईल असे आयोगापुढे सांगितले. म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा तसेच त्यामध्ये कालावधी नमूद करुन व इतर रकाने देखील पूर्णपणे भरावेत आणि सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त

झाल्या नंतर विहित मुदतीत तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1308-1310

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.